POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-१७३ ● मुंबई, शनिवार, २४ जानेवारी २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## मुंबईत मंगळवारपासून पुढील सात दिवस शहर आणि पूर्व उपनगरात १० टक्के पाणीकपात

### या भागात असेल पाणीकपात

**मुंबई शहर :**

- 'ए' विभाग - नेव्हल डॉकयार्ड क्षेत्र
- 'बी' विभाग - संपूर्ण विभाग
- 'सी' विभाग - भेंडी बाजार, बोहरी मोहल्ला, घोगरी मोहल्ला क्षेत्र
- 'ई' विभाग - पूर्ण विभाग
- 'एफ दक्षिण' विभाग - संपूर्ण विभाग
- 'एफ उत्तर' विभाग - संपूर्ण विभाग

**पूर्व उपनगरे :**

- 'टी' विभाग - मुलुंड (पूर्व) आणि (पश्चिम) क्षेत्र
- 'एस' विभाग - भांडुप, नाहूर, कांजूरमार्ग आणि विक्रोळी (पूर्व) क्षेत्र
- 'एन' विभाग - विक्रोळी, घाटकोपर (पूर्व), घाटकोपर
- 'एल' विभाग - कुर्ला (पूर्व) क्षेत्र
- 'एम पूर्व' विभाग - संपूर्ण विभाग
- 'एम पश्चिम' विभाग - संपूर्ण विभाग

**■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

मुंबई महानगरपालिकेस पाणीपुरवठा करणाऱ्या पिसे येथील 'न्यूमॅटिक गेट सिस्टिम'च्या वार्षिक परिरक्षणाचे काम हाती घेतले जाणार आहे. हे कामकाज मंगळवार, २७ जानेवारी २०२६ पासून शनिवार, ७ फेब्रुवारी २०२६ पर्यंत नियोजित आहे. त्यामुळे शहर विभाग आणि पूर्व उपनगरांतील बहुतेक प्रशासकीय विभागांचा पाणीपुरवठा प्रभावित होणार आहे. या कालावधीत शहर विभाग व पूर्व उपनगरांमध्ये १० टक्के पाणीकपात लागू करण्यात येणार आहे. तसेच ठाणे व भिवंडी महानगरपालिकेच्या हद्दीतील ज्या भागास मुंबई महानगरपालिकेतर्फे पाणीपुरवठा होतो त्या भागांमध्येही ही १० टक्के पाणीकपात लागू राहणार आहे. तरी परिसरांमधील सर्व नागरिकांनी खबरदारीचा उपाय म्हणून या कालावधीत पाणी काटकसरीने वापरावे आणि सहकार्य करावे, असे आवाहन मुंबई मनपा प्रशासनाने केले आहे.



## ड्रोनचा पहारा.... २४ तास पोलीस बंदोबस्त
## रेल्वे स्थानकांवर नेमकं काय घडतंय?

**प्रवाशांना आवाहन**

रेल्वे पोलीस प्रशासनाने प्रवाशांना दरवाजात उभे राहून मोबाईल किंवा मौल्यवान वस्तू हातात न धरता प्रवास करण्याचे आवाहन केले आहे. कोणतीही संशयास्पद हालचाल दिसल्यास तात्काळ जवळच्या सुरक्षा कर्मचाऱ्यांना किंवा पोलिसांना माहिती देण्यास सांगण्यात आले आहे. सतर्कता आणि सुरक्षेच्या उपाययोजनांमुळे फटका गँगवर नियंत्रण मिळवण्याची प्रक्रिया सुरू असून, भविष्यात ही समस्या पूर्णपणे आटोक्यात येईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.



मुंबई लोकलने प्रवास करणाऱ्यांसाठी कामाची बातमी! लोकलला लाईफलाइन असे म्हणटले जाते. मात्र या लाईफलाइनवर आता ड्रोनचा पहारा असाणार आहे. इतकेच नाही तर २४ तास पोलिसांचा गस्त असणार आहे. हा काटेकोर बंदोबस्त करण्यामागे एक महत्त्वाचं कारण आहे.

**■मुंबई । प्रतिनिधी,**

मुंबई लोकल ही लाखो प्रवाशांची जीवनवाहिनी आहे. मात्र काही वर्षांपासून लोकल आणि मेल-एक्स्प्रेसमध्ये प्रवास करणाऱ्या नागरिकांसाठी फटका गँग ही मोठी डोकेदुखी ठरली होती. दरवाजात उभ्या प्रवाशांच्या हातावर जोरदार प्रहार करून मोबाईल, दागिने यांसारख्या मौल्यवान वस्तू पळवणाऱ्या या टोळ्यांमुळे अनेक अपघातही घडले. ही समस्या रोखण्यासाठी आता रेल्वे पोलीस आणि सुरक्षा यंत्रणा अधिक सतर्क झाल्या आहेत. जाणून घ्या कोणकोणत्या स्थानकांवर ड्रोनचा पहारा असाणार.

फटका गँग प्रामुख्याने रेल्वे रुळालगतच्या झुडपांमध्ये, अंधाऱ्या जागी किंवा मोठ्या पुलांच्या खांबाजवळ दबा धरून बसते. लोकल किंवा एक्स्प्रेस ट्रेन सुरू असताना दरवाजात उभा असलेला प्रवासी मोबाईल हातात धरलेला दिसला की, लाकडी काठी किंवा लोखंडी सळईने त्याच्या हातावर जोरात वार केला जातो. अचानक झालेल्या हल्ल्यामुळे वस्तू हातातून खाली पडते आणि ती उचलून गँग पळ काढते. अशा प्रकारांमध्ये काही प्रवाशांना गंभीर दुखापत झाली असून काहींना जीवही गमवावा लागला आहे.

**प्रवाश्यांच्या सुरक्षेसाठी रेल्वे प्रशासन सजग**

या घटना थांबवण्यासाठी मध्य आणि पश्चिम रेल्वे मार्गावर सुरक्षा व्यवस्थेत मोठी वाढ करण्यात आली आहे. सध्या एकूण ६० संवेदनशील ठिकाणांची नोंद आहे. यामध्ये मध्य रेल्वेवरील ३९ आणि पश्चिम रेल्वेवरील २१ ठिकाणांचा समावेश आहे. या परिसरात दोन पाळ्यांमध्ये सुरक्षा जवानांची गस्त सुरू आहे. ड्रोनच्या मदतीने रेल्वे मार्गावर लक्ष ठेवले जात असून संशयास्पद हालचालींवर तात्काळ कारवाई केली जात आहे.

**गुन्ह्यांमध्ये घट, पोलिसांचा दावा**

रेल्वे पोलिसांच्या माहितीनुसार, फटका गँगच्या गुन्ह्यांमध्ये गेल्या काही वर्षांत लक्षणीय घट झाली आहे. पूर्वी एका वर्षात ८० ते ८५ गुन्हे दाखल होत असत. मात्र मागील वर्षी फक्त १२ प्रकरणांची नोंद झाली. ही घट वाढीव गस्त, सातत्याने होणाऱ्या कारवाया आणि प्रवाशांमध्ये निर्माण झालेल्या जागरूकतेमुळे झाल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे.

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुढे ढकलणार? समोर आलं मोठं कारण

राज्यात निवडणूक आयोगाकडून महापालिका निवडणुकांनंतर आता जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांची घोषणा करण्यात आली आहे. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रचाराला वेग आला असून, जोरदार तयारी सुरू आहे. मात्र या निवडणुकीचा फटका आता ग्रामपंचायत निवडणुकीला बसण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे, निवडणुका पुढे ढकलल्या जाण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

**■मुंबई । प्रतिनिधी,**

राज्यात सध्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची रणधुमाळी सुरू आहे. आधी नगर परिषद आणि नगर पंचायतीच्या निवडणुका झाल्या, त्यानंतर महाराष्ट्रातील २९ महापालिकांच्या निवडणुका झाल्या, या निवडणुकांमध्ये राज्यात भाजप हा सर्वात मोठा पक्ष ठरला, दरम्यान महापालिका निवडणुका झाल्यानंतर आता महापौरपदांसाठी सोडत जाहीर झाली असून, आपलाच महापौर महापलिकेत बसावा, यासाठी प्रत्येक पक्ष संख्याबळाचं गणित जुळवण्याचा प्रयत्न करत असल्याचं पहायला मिळत आहे. तर दुसरीकडे त्यानंतर निवडणूक आयोगाकडून राज्यता जिल्हा परिषद आणि पंचायत समितींच्या निवडणुकांची घोषणा करण्यात



आली आहे. निवडणूक आयोगानं जाहीर केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार येत्या पाच फेब्रुवारी रोजी राज्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी मतदान होणार आहे. तर सात फेब्रुवारी रोजी मतमोजणी होणार आहे, आता त्यातच एक मोठी बातमी समोर आली आहे.

ती म्हणजे जालना जिल्ह्यातल्या जवळपास ४७५ ग्रामपंचायतींची मुदत जानेवारी आणि फेब्रुवारी महिन्यात संपत आहे, मात्र याच कालावधीमध्ये जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुका होणार असल्यानं आणि परीक्षांचा हंगाम पाहता या ग्रामपंचायतींच्या निवडणुका चार महिने लांबणीवर पडण्याची शक्यता आहे, त्यामुळे या गावांचा कारभार आता प्रशासकांच्या हाती जाणार असल्याचं जवळपास निश्चित झालं आहे. फेब्रुवारी महिन्यात मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतीमध्ये अनेक मोठ्या लोकसंख्येच्या गावांचा समावेश आहे, त्यामुळे मुदत संपण्यापूर्वी निवडणुका होणे अपेक्षित आहे, मात्र याच निवडणुकीच्या काळात दहावी आणि बारावीच्या परीक्षा असल्यामुळे या निवडणुका पुढे ढकलल्या जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे या निवडणुकांसाठी इच्छुक असलेल्या संभाव्य उमेदवारांना आता प्रतिक्ष करावी लागू शकते.

## अर्बन कंपनीच्या मसाज थेरपिस्टकडून महिलेला मारहाण
### बुकिंग रद्द केल्याने संतप्त, मारहाणीचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल

**■बीड। प्रतिनिधी,**

मुंबईतील वडाळा परिसरातून एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. बुकिंग रद्द केल्याच्या कारणावरुन अर्बन कंपनी ॲपच्या माध्यमातून बोलावलेल्या मसाज थेरपिस्टने एका महिलेला मारहाण केली आहे. पीडितेच्या तक्रारीनंतर पोलिसांनी या प्रकरणाची नोंद करून तपास सुरू केला आहे.

**नेमकी घटना काय ?**

४६ वर्षीय पीडित महिला वडाळा येथे आपल्या मुलासोबत राहते. तिने पोलिसांना दिलेल्या माहितीनुसार, 'फ्रोजन शोल्डर'च्या उपचारासाठी तिने अर्बन कंपनीद्वारे मसाज सेवा बुक केली होती. ठरलेल्या वेळेनुसार एक महिला थेरपिस्ट त्यांच्या घरी पोहोचली. मात्र, त्या थेरपिस्टची वागणूक आणि ती सोबत घेऊन आलेला मोठा मसाज बेड पाहून पीडित महिला अस्वस्थ झाली. यामुळे पीडितेने बुकिंग रद्द करण्याचा निर्णय घेतला.



**...म्हणून केली मारहाण**

पीडितेने मसाज सेशन रद्द करुन रिफंड प्रक्रिया सुरु केल्याने थेरपिस्ट संतापली. तिने पीडित महिलेला शिवीगाळ करत मारहाण करण्यास सुरुवात केली. पीडितेने केलेल्या आरोपानुसार, थेरपिस्टने तिचे केस ओढले, तोंडावर बुक्के मारले, अंगावर ओरखडे ओढले आणि तिला जमिनीवर ढकलून दिले. मध्यस्थी करण्यासाठी आलेल्या मुलालाही थेरपिस्टने धक्काबुक्की केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

## लहान मुलांना मोकळे सोडू नका, पुणे पोलिसांनी दिल्या अजब सूचना

**■मुंबई । प्रतिनिधी,**

पुणे पोलिसांनी शहरातील नागरिकांना पाळीव प्राण्यांना, लहान मुलांना सोसायटीच्या गेट जवळ मोकळे सोडू नका याशिवाय फुटपाथवर शिस्तबद्ध उभे राहून टाळ्या वाजवू शकता अशा अजब सूचना दिल्या आहेत. या सूचना वाचून तुम्हालाही प्रश्न पडलाच असेल की हे कशासाठी. तर, पुण्यात सुरू असलेल्या आंतरराष्ट्रीय ह्यपुणे ग्रँड चॅलेंज टूरह्व सायकल स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर पुणे पोलिसांनी शहरातील नागरिकांसाठी विशेष सूचना आणि नियमावली जारी केली आहे. या सूचना देण्यामागचं



**काय म्हणाले पोलीस?**

पोलिसांनी स्पष्टपणे सांगितले आहे की, लहान मुले आणि पाळीव प्राणी यांना रस्त्यावर किंवा सोसायटीच्या गेटजवळ मोकळे सोडू नये. कारण स्पर्धेत भाग घेतलेले सायकलस्वार मोठ्या वेगाने स्पर्धेत सहभागी होतात. त्याच्या सायकलच्या समोर येऊन कोणतीही अनुचित घटना घडू नये, यासाठी या सूचना देण्यात आली आहे. तसेच, सोसायटीतील रहिवाशांनी वाहतूक बदलांचा विचार करून आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असेही पोलिसांनी नमूद केले आहे.

कारण म्हणजे ही स्पर्धा सुरळीत, सुरक्षित आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पडावी हे आहे. यासाठी डेक्कन पोलिस ठाण्याच्या वतीने नागरिकांना काही अजब, मात्र सुरक्षेच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाच्या सूचना देण्यात आल्या आहेत. याशिवाय आज पुण्यामधील सर्व शाळा दुपारच्या सत्रात बंद ठेवण्यात आल्या आहेत.

**स्पर्धा बघायला येणाऱ्या नागरिकांसाठीही सूचना**

स्पर्धा पाहण्यासाठीही अनेक नागरिक गर्दी करत आहेत. आंतरराष्ट्रीय स्थरावरून स्पर्धक या स्पर्धेत आलेले आहेत. त्यांना बघायला उत्सुक असलेल्या नागरिकांसाठीही पोलिसांनी मार्गदर्शन केले आहे. नागरिकांनी फुटपाथवर शिस्तबद्ध पद्धतीने उभे राहावे, रस्त्यावर उतरू नये आणि स्पर्धकांना प्रोत्साहन देण्यासाठी टाळ्या वाजवाव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे. कोणत्याही प्रकारची गर्दी, गोंधळ किंवा नियमभंग होऊ नये, यासाठी पोलीस यंत्रणा सतर्क आहे.

दरम्यान, या स्पर्धेच्या चौथ्या टप्प्यामुळे पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील सर्व सरकारी आणि खासगी शाळा आज दुपारी 12 नंतर बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष जितेंद्र डुडी यांनी हे निर्देश दिले आहेत. बालेवाडी ते बालगंधर्व रंगमंदिर या मार्गावर स्पर्धा होणार असल्याने वाहतूक कोंडी आणि विद्यार्थ्यांची गैरसोय टाळण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

पुणे पोलिसांनी नागरिकांना सहकार्य करण्याचे आवाहन करत, नियमांचे पालन केल्यास ही आंतरराष्ट्रीय स्पर्धा यशस्वी आणि सुरक्षितपणे पार पडेल, असा विश्वास व्यक्त केला आहे.

## मुलगा नपुंसक असल्याचं लपवून लग्न लावून दिलं अन् नंतर सुनेला... महाराष्ट्राला हादरवणारा प्रकार

**नपुंसकत्व म्हणजे काय?**

नपुंसकत्व हे भारतीय समाजामध्ये फारश्या न बोलल्या जाणाऱ्या लैंगिक समस्यांपैकी एक आहे. नपुंसकत्व ही वैद्यकीय समस्या आहे. ही अडचण असलेल्या पुरुषांना लैंगिक संबंध ठेवण्यासाठी पुरेशी उत्तेजना मिळत नाही. किंवा ते पुरेसे उत्तेजित होऊ शकत नाही किंवा ते उत्तेजन टिकवता येत नाही. अशा व्यक्तींना शरीरसंबंध ठेवताना अडचण येते. या साऱ्यालाच मराठीत 'नपुंसकता' किंवा 'लैंगिक अक्षमता' असेही म्हणतात.

**■मुंबई । प्रतिनिधी,**

लग्न ठरवताना सर्व गोष्टींची काळजी घेतली पाहिजे असं आपण अनेकदा ऐकतो. गावाकडेही सोयरीक जुळवताना सगळ्या गोष्टींची शहानिशा करुन घ्यावी असं सांगितलं जातं. मात्र लग्न ठरवताना मुलाकडून किंवा मुलीच्या घरच्यांकडूनच एखादी गोष्ट जाणूनबुजून लपवण्यात आली तर? असे अनेक प्रकार आपण यापूर्वी ऐकले असतील किंवा त्याबद्दल वाचलंही असेल.

मात्र मराठवाड्यातील छत्रपती संभाजी नगरमध्ये घडलेल्या एका विचित्र प्रकरणामध्ये मुलाच्या घरच्यांनी लपवून ठेवलेलं त्याच्या लैंगिकतेसंदभार्तील सत्य समोर आल्यानंतर सूनेलाच मारहाण करण्यात आली आहे. हे प्रकरण आता पोलीस स्टेशनपर्यंत पोहचलं असून या प्रकरणाची पंचक्रोषीत चर्चा असल्याचं दिसत आहे.

**तिनेच कंटाळून पोलीस स्टेशनमध्ये घेतील धाव**

मिळालेल्या माहितीनुसार,





मुलाचं नपुंसकत्व लपवून लग्न लावल्याचा आणि त्यानंतर पैशांसाठी विवाहितेचा छळ केल्याचा हा प्रकार छत्रपती संभाजी नगरात समोर आला आहे. सदर प्रकरणामधील पीडिता ३२ वर्षांची आहे. सासरच्या मंडळींने फसवणूक केल्यानंतर अत्याचार सुरु केल्याने या पीडित विवाहितेने छावणी पोलीस ठाण्यात धाव घेत पतीसह सासरच्या दहा जणांविरोधात तक्रार दाखल केली आहे. पत्नीने डॉक्टरांकडे जाण्याची मागणी केल्यानंतर पतीकडून मारहाण आणि मानसिक छळ केल्याचा आरोप पीडितेने केला आहे.

**नाशिकमध्ये फ्लॅट घेण्यासाठी मागितले १५ लाख**

सासरच्या मंडळींना पतीच्या नपुंसकत्वाची माहिती असूनही पीडितेला गप्प राहण्याचा सल्ला दिल्याचा आरोप आहे. आपल्या मुलातील दोष लपवून फसवून मुलीचं लग्न लावून दिल्यानंतर तिच्याकडे हुंडाही मागण्यात आल्याचं आरोपामध्ये म्हटलं आहे. नाशिक येथे फ्लॅट खरेदीसाठी १५ लाख रुपयांची मागणी पीडितेकडे करण्यात आली. पैसे देण्यासाठी सारच्या मंडळींकडून तिच्यावर वारंवार दबावही टाकण्यात आला. या प्रकरणी छावणी पोलिसांनी गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

## स्कूल व्हॅनमध्ये ४ वर्षीय चिमुकलीचा विनयभंग

**■बदलापुर। प्रतिनिधी,**

बदलापुरात एक अत्यंत धक्कादायक आणि संतापजनक घटना समोर आली आहे. एका खासगी इंग्रजी माध्यमाच्या शाळेत प्री-प्रायमरीत शिक्षण घेणाऱ्या अवघ्या चार वर्षांच्या चिमुकलीसोबत स्कूल व्हॅनच्या चालकाने कथितरित्या छेडछाड केल्याचा गंभीर आरोप आहे. या प्रकरणी तक्रार दाखल होताच स्थानिक पोलिसांनी तत्काळ कारवाई करत आरोपी व्हॅन चालकाला अटक केली असून संबंधित स्कूल व्हॅन जप्त करण्यात आली आहे.

ही घटना गुरुवारी (२२ जानेवारी) घडली. दुपारी साडेबारा वाजता नेहमीप्रमाणे मुलगी घरी न पोहोचल्याने कुटुंबीयांमध्ये एकच खळबळ उडाली. जवळपास एक तासाच्या उशिरानंतर मुलगी घरी आली. घरच्यांनी विचारपूस केली असता सुरुवातीला ती काहीच बोलली नाही. मात्र ती घाबरलेली असल्याचे लक्षात आल्यानंतर वारंवार विचारल्यावर तिने स्कूल व्हॅन चालकाने आपल्यासोबत चुकीची हरकत केल्याचे सांगितले.

या प्रकारामुळे संतप्त झालेल्या कुटुंबीयांनी प्रथम शाळा व्यवस्थापनाकडे तक्रार केली आणि त्यानंतर स्थानिक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. प्रकरणाची गंभीरता लक्षात घेता पोलिसांनी तत्काळ आरोपीला ताब्यात घेतले. घटनेची माहिती पसरताच परिसरात संतापाची लाट उसळली. संतप्त नागरिकांनी संबंधित स्कूल व्हॅनची तोडफोडही केली.



## बदलापूर अत्याचार प्रकरणाची बालहक्क आयोगाकडून दखल

**■बदलापूर। प्रतिनिधी,**

बदलापूरच्या प्री स्कूल मध्ये शिकणाऱ्या चार वर्षीय चिमुकलीवर झालेल्या अत्याचार घटनेत बदलापूर पुन्हा एकदा हादरला आहे. या प्रकरणाची गंभीर दखल राज्य बालहक्क आयोगाच्या सचिवांनी घेतली असून या संपूर्ण प्रकरणाचा आढावा घेतला घेऊन शासनाला अहवाल सादर करण्यात येणार असल्याचे सांगितले.

शुक्रवारी बाल हक्क आयोगाच्या सचिवांनी बदलापूरात येऊन पोलीस तसेच शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन या संपूर्ण प्रकरणाचा आढावा घेतला. ही घटना एका प्री स्कूलशी संबंधित असून कोणतही प्री स्कूल शासनाच्या अखत्यारीत येत नसल्याचे बाल हक्क आयोगाचे सचिव लक्ष्मण राऊत यांनी सांगितले. या घटनेबाबत बाल हक्क आयोग शासनास अहवाल सादर करणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले, तर बदलापुरात दहा अनधिकृत शाळा असून त्यातील तीन शाळा बंद करण्यात आल्या असून इतर शाळांना नोटीस बजावण्यात आल्या असल्याचे गटशिक्षण अधिकारी विशाल पोतेकर यांनी सांगितले. कोणतीही प्री स्कुल शिक्षण विभागाच्या अधिपत्याखाली येत नसल्याने प्री स्कूल बाबत निर्णय घेण्याचा अधिकार आम्हाला नसल्याचेही त्यांनी सांगितले.त्यामुळे आता या प्री स्कूल मधील विद्यार्थ्यांच्या सुरक्षा बाबत शासन काय निर्णय घेणार हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

दरम्यान, बदलापूर शहरात अनेक विद्यार्थी हे प्री स्कूलमध्ये शिकत असून या प्री स्कूल शालेय शिक्षण विभागाच्या अखत्यारीत आणाव्यात अशी मागणी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे करणार असल्याचे राष्ट्रवादीच्या संगीता चेंदवणकर यांनी सांगितले.



# संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

## आपल्या राजकीय संस्कृतीचे अधःपतन



आपला देश स्वतंत्र झाल्यानंतरच्या काळातील राजकारणी किती सुसंस्कृत, सहिष्णू होते याचे अनेक किस्से आपण ऐकलेले आहेत. विरोधकांची कसलीही भीडभाड न ठेवता प्रखर टीका करणारे 'मराठा'चे संपादक आचार्य अत्रे आणि यशवंतराव चव्हाण यांच्याविषयीचा एक किस्सा अधूनमधून विविध माध्यमांतून प्रसिद्ध होत असतो. यशवंतराव चव्हाण यांना मूल-बाळ नव्हते, यावरून ते निपुत्रिक असल्याची टीका अत्रे यांनी केली असता यशवंतरावांनी अत्रे यांना फोनवर सांगितले की, 'चले जाव' आंदोलनाच्या वेळी त्यांना पकडण्यासाठी इंग्रज पोलीस त्यांच्या घरी आले असता त्यांच्या गरोदर पत्नीच्या पोटावर पोलिसांनी लाठीने प्रहार केल्याने गर्भपात होऊन गर्भाशयाला दुखापत झाली आणि त्यामुळे त्यांना मूल होऊ शकले नाही. हे ऐकून आचार्य अत्रे यांना खूप पश्चाताप झाला. त्यांनी यशवंतरावांची, त्यांच्या पत्नीची त्यांच्या घरी जाऊन जाहीर माफी मागितली. या प्रकरणातून दोन व्यक्तिमत्वांचे वेगळे पैलू आपल्याला दिसतात. व्यक्तीगत स्वरूपाची टीका झाल्यावर कसलाही राग जाहीरपणे व्यक्त न करता शांतपणे आपले म्हणणे फोनवर अत्रे यांना कळवणारे यशवंतराव आणि आपल्याकडून चूक झाली हे लक्षात आणून दिल्यावर तेवढ्याच तत्परतेने आणि मनापासून चव्हाण दांपत्याची बिनशर्त जाहीर माफी मागणारे अत्रे. तसेच मोठ्या मनाने त्यांना माफ करणारे यशवंतराव आणि त्यांच्या पत्नी वेणूताई. पंडित जवाहरलाल नेहरू पंतप्रधान असताना प्रख्यात व्यंगचित्रकार के. शंकर पिल्लई (शंकर) हे नेत्यांवर तसेच राजकारणावर टीकात्मक भाष्य करणारी व्यंगचित्रे आपल्या 'शंकर्स वीकली'मध्ये प्रसिद्ध करत. त्या वेळी नेहरू यांनी, द्वेषभाव व्यक्त न करता राजकारण्यांच्या उणिवा व्यंगचित्रातून दर्शविण्याच्या, शंकर यांच्या कौशल्यास दाद दिली आणि म्हणाले होते, ''शंकर, तुम्ही मला सोडू नका.'' राजकारणावर व्यंगात्मक भाष्य निर्भयपणे व्यक्त करण्यासाठी आपल्या टीकाकारांना अभय देणारी नेहरू यांची भूमिका एकूणच राजकीय संस्कृतीची प्रगल्भता दर्शवित. नरसिंह राव पंतप्रधान असताना जिनेव्हा येथे भारताचे प्रतिनिधित्व करण्यासाठी विरोधी पक्षातले अटल बिहारी वाजपेयी यांना पाठवणे, राजीव गांधी यांनी वाजपेयी यांचा युनोच्या शिष्टमंडळात समावेश करून त्यांच्या गंभीर आजारावर परदेशी उपचार सुलभ करून देणे, वाजपेयी यांनी आपल्याच पक्षाच्या मुख्यमंत्र्यांना कर्तव्यात कसूर केल्याबद्दल जाहीरपणे राजधर्माची आठवण करून देणे, ही आणखी काही अशी उदाहरणे आहेत की, आजचा राजकारणाचा स्तर पाहता नव्या पिढीला अक्षरशः काल्पनिक वाटावीत. परिपक्व लोकशाही कशी असते हे दाखवून देणारा तो काळ असा होता की, विरोधकांना विरोधक मानले जायचे, शत्रू नव्हे. सत्ताधारी पक्ष देशासमोरील गंभीर प्रश्नांवर विरोधकांना विश्वासात घेत असे. विरोधी पक्षदेखील अशा गंभीर प्रसंगी सरकारच्या मागे खंबीरपणे उभे राहत असत. आणीबाणीच्या काळातील दडपशाही वगळता हे चित्र साधारणतः असे होते. परंतु, गेल्या काही काळात या राजकीय संस्कृतीने १८० अंशाचे वळण घेतलेले दिसत आहे. महाराष्ट्रात झालेल्या निवडणुकांच्या दरम्यान आणि त्यानंतरची स्थिति पाहता, ही संस्कृती रसातळलाच गेली की काय असे वाटते. काहीही करून भल्या-बुऱ्या मार्गाने सत्ता मिळवणे आणि ती टिकवून ठेवणे हेच उद्दीष्ट ठेऊन राजकारण करणे सुरू झाले तेव्हा याची सुरुवात झाली. त्यासाठी वापरल्या जाणाऱ्या अस्त्रांपुढे राजकारणातील सुसंस्कृतता आणि प्रगल्भता कालबाह्य ठरत असून लोकशाहीचा गाभाच धोक्यात येईल की काय अशी भीती वाटत आहे. लोकशाहीच्या मुळावर उठलेली ही अस्त्रे आहेत तरी कोणती? पूर्वी विरोधक हे राजकारणातल्या मुद्द्यांपुरतेच विरोधक असत. परंतु आता विरोधक म्हणजे आपला शत्रू ही भूमिका काही पक्षांनी घेतलेली दिसते आहे. सत्ताधारी पक्षाच्या चुकीच्या धोरणांना विरोध केला की तो सरकारचा, म्हणजे देशाचा शत्रू, म्हणून तो देशद्रोही. आपला पक्ष धमार्धारीत राजकारण करतो, तर आपल्याला विरोध म्हणजे आपल्या धमार्ला विरोध, म्हणून विरोधक धर्मद्रोही. बरे, हे प्रकरण एवढ्यावरच थांबत नाही. अशी मांडणी करून विरोधकांना देशद्रोही, धर्मद्रोही ठरवले की त्यांच्या प्रत्येक वक्तव्याची, कृतीची काटेकोर चिकित्सा करून त्यास देश/धर्मद्रोहाचा आयाम दिला जातो आहे. एकदा का विरोधकांवर देश/धर्म द्रोहाचा शिक्का मारला की, मग सुरू होतो अपप्रचार. मॉर्फ केलेले फोटो/व्हीडीओ, खोटे आरोप यांची विविध माध्यमांमधून नुस्ती राळ उडवून दिली जाते. हल्ली सामाजिक माध्यमांमध्ये ट्रोल नावाच्या जमातीचा उदय झाला (खरे तर जाणीवपूर्वक केला गेलेला) आहे. या मिथ्या आरोपांच्या ट्रोलधडीला उत्तरे देता देता विरोधकांची दमछाक होते. मोठ्या प्रमाणावर झालेला हा अपप्रचार केवळ सामाजिक माध्यमांवर पोसलेल्या बहुसंख्य जनतेला खरा वाटू लागतो. व्यक्तीगत खऱ्या-खोट्या बाबींना सार्वजनिक स्वरूप देऊन त्या आधारे चारित्र्यहनन करणे आणि त्यासाठी हिणकस भाषा वापरणे हल्ली नित्याचे झाले आहे. बार गर्ल, ५० करोड की गर्लफ्रेंड, नीच व्यक्ति असे हीन अभिरुचीचे शब्दप्रयोग जबाबदार उच्चपदस्थांकडून केले जात आहेत. 'मरणांतानि वैराणी...' हे आपले पूवार्पार तत्त्व बाजूस ठेऊन मृत विरोधी पक्षांच्या नेत्यांवर आपल्या अपयशाचे खापर फोडत राहणे नित्याचे झाले आहे. एवढेच नाही तर अशा व्यक्तींचे पूर्वज वेगळ्या धमार्चे कसे होते, वाईट चालीचे कसे होते याविषयी अपप्रचार करून तिरस्कार पसारविला जात आहे. अपप्रचार करणे, ट्रोल करणे हे आजच्या काळात यशस्वी होत असताना पाहून आता काही विरोधकांनीसुद्धा तोच मार्ग पत्करला असल्याचे दृश्य दिसत आहे. परंतु याचा परिणाम अत्यंत घातक होणार आहे. अपप्रचार, ट्रोल या लढाईत सत्य मात्र पराभूत होणार आहे. लोकशाहीत विधायक 'विरोध' अस्तीत्वात नसेल तर सत्ताधारी निरंकुश होतात हे वेळोवेळी सिद्ध झालेले आहे, नव्हे, निरंकुश सत्तेसाठीच विरोध नष्ट केला जातो असे इतिहास सांगतो. आपल्याकडे विरोधकांना नेस्तनाबूत करण्यासाठी नक्षली, दहशतवादी असल्याचा शिक्का त्यांच्यावर मारला जातोय. शिवाय राजद्रोहासारखे आरोप लावून बेमुदत तुरुंगात टाकले जात आहे. त्यांना जामीनसुद्धा मिळणार नाही याची व्यवस्था केली जात आहे. राजकीय संस्कृतीचे हे अधःपतन होत असताना लोकांच्या जिव्हाळ्याचे महागाई, बेरोजगारी, शिक्षण, आरोग्य यासारखे मूलभूत प्रश्न मागे पडतात हे खरेच. परंतु त्याचवेळेस लोकशाहीच्या पायालाच हादरे बसणे हे देशासाठी अत्यंत गंभीर आहे. एवढेच नाही तर लोकांच्या नित्य आचरणात देखील ते रुजवले जाऊ शकते. त्याविरुद्ध जनतेनेच आता आवाज उठवला पाहिजे.

# एमआयएमचा विजय की भाजपच्या बहिष्काराचा पराजय!

**कैसा हराया.... असे म्हणत संपूर्ण मुंब्रा हिरवा करण्याचे आव्हान नवनिर्वाचित नगरसेविका सहर युनुस शेख यांनी दिले आहे. मुंब्रातील वॉर्ड क्रमांक ३० मधून एमआयएम पक्षाच्या नगरसेविका म्हणून त्या निवडून आल्या आहेत. सहर शेख यांच्या भाषणातील एक तुकडा रिल बनून प्रत्येकाच्या मोबाईलवर आला आहे. याविरोधात आता भाजपचे माजी खासदार किरीट सोमय्या यांनी पोलिसात तक्रार दाखल केली आहे. भाजपच्या या ध्रुवीकरणाच्या राजकारणामुळेच एक समूह आता स्वतःचे राजकीय अस्तित्व शोधत आहे.**




एक मुस्लीम तरुणी निवडून येते आणि संपूर्ण मुंब्रा हिरव्या रंगाने रंगवून टाकेन म्हणते. तिने असं म्हटल्याबरोबर सगळीकडे ती अस्सं कस्सं म्हणू शकते, असं म्हणत चर्वितचर्वण सुरू झाले. याची दुसरी बाजू ही आहे की, हैदराबादमधील खासदार बॅरिस्टर असदुद्दीन ओवैसी यांच्या अध्यक्षतेतील एमआयएमचे राज्यातील २९ महापालिकांमध्ये १२५ नगरसेवक विजयी झाले आहेत. राज्यात एमआयएमला एवढे यश प्रथमच मिळाले आहे. सहर शेख यांनी ज्याप्रमाणे भाजप, कॉंग्रेस, दोन्ही शिवसेना, दोन्ही राष्ट्रवादी आणि वंचित बहुजन आघाडीसोबत टक्कर देऊन हे यश मिळवले, तसेच राज्यातील उर्वरित सर्व महापालिकांमध्ये तथाकथित प्रस्थापित पक्षांना धूळ चारत एमआयएमचे हे सव्वाशे 'शेर' निवडून आले आहेत.

भारतातील निवडणुकीचे राजकारण हेच मुळात जातीधमार्धारित आणि ध्रुवीकरणावर टिकून आहे. २०१४ पासून यात झालेला आमूलाग्र बदल पाहिला तर ही देशांतर्गत झालेली न दिसणारी फाळणीच. भारतीय जनता पक्षाकडून मुस्लिमांना उमेदवारी द्यायची नाही, असा अलिखित नियम झाला आहे. मुस्लिमांना उमेदवारी नाकारणे हा एकप्रकारे त्यांच्यावर राजकीय बहिष्कार आहे. भाजपने सुरू केलेल्या या राजकीय बहिष्काराला कॉंग्रेसनेही प्रत्यक्ष अप्रत्यक्ष पाठिंबा द्यायला सुरुवात केली. मुस्लिमांना उमेदवारी दिली तर आपली जागा जाणार या भीतीपेक्षा आपण मुस्लिमधार्जिणे ठरू आणि त्याचा परिणाम इतर जागांवर होऊन इतर उमेदवार पराभूत होतील या भयगंडाने फक्त कॉंग्रेसच नाही, तर समाजवादी पक्ष, आम आदमी पार्टी, बहुजन समाज पार्टी, हे उत्तरेतील आणि महाराष्ट्रातीलही पक्ष काही प्रमाणात मुस्लिमांना उमेदवारी टाळायला लागले. याचा परिणाम मुस्लिमांनी त्यांच्या म्हणून असणाऱ्या पक्षाला निवडण्यास सुरुवात केली. यातूनच मुस्लीमबहुल भागातून एमआयएमला मोठ्या प्रमाणात यश मिळायला लागले. नेता आपला. भाषा आपली. पक्षामध्ये सन्मान आपला आणि विजयदेखील आपलाच. असं चित्र जेव्हा दिसायला लागलं तेव्हा साहजिकच मुस्लीम समाजाचा ओढा हा एमआयएमकडे वाढायला लागला, त्याचाच एकूण परिणाम महापालिका निवडणुकीत १२५ जागांवर दिसून आला आहे. एका महापालिकेत सत्तेच्या जवळ तर एका महापालिकेत प्रमुख विरोधी पक्षाची जागा एमआयएमने काबीज केली आहे.

सहर शेख आणि त्यांचे वडील युनूस शेख यांचेच उदाहरण द्यायचे झाले तर, हे कुटुंब राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या स्थापनेपासून पक्षात सक्रिय सदस्य. युनूस शेख मुंब्रा भागातील राष्ट्रवादीचा चेहरा म्हणून ओळखले जात होते. राष्ट्रवादीमध्ये युवक अध्यक्षापासून त्यांनी काम केलेले, पक्ष सोडला तेव्हा मुंब्रा ब्लॉक अध्यक्ष होते. जितेंद्र आव्हाडांसोबत त्यांचे मैत्रीपूर्ण संबंध राहिलेले. आज भरसभेत आव्हाडांना आव्हान देर्णाया नगरसेवक सहर शेख या कालपर्यंत त्यांना अंकल म्हणत होत्या. असे सर्व असताना महापालिका निवडणुकीत युनूस शेख यांना राष्ट्रवादी कॉंग्रेसने तिकीट नाकारले. याचा परिणाम असा झाला की, त्यांना मुलीला दुसऱ्या पक्षातून निवडणुकीसाठी उभे करावे लागले. एमआयएम पक्षाचे अध्यक्ष ओवेसी स्वतः बॅरिस्टर आहेत. त्यांचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष इम्तियाज जलील उच्चविद्याविभूषित आणि माजी खासदार राहिलेले. मुस्लिमांमधील उच्चशिक्षित तरुण, तरुणींना उमेदवारी देणे आणि त्यांना निवडून आणण्यासाठी मायक्रो प्लॅनिंग करणे ही एमआयएमची रणनीती राहिलेली आहे. सहर शेख यांची प्रचारसभांमधील भाषणे पाहिली तर फक्त विकासावर त्या बोलतात. त्याशिवाय त्यांचा रोष फक्त आव्हाडांवर आहे. त्यांच्या बोलण्यामध्ये वारंवार अल्लाहचा उल्लेख येतो, पण त्यांच्या भाषेचा लहेजा उर्दू नाही तर त्याला इंग्रजीचा स्पर्श आहे. त्यामुळे अशा उमेदवाराची मीडियाने दखल घेतली नसती तरच नवल. फरक एवढाच की त्यांच्या भाषणातील एक चंक उचलून 'हरा कर देंगे' यालाच हायलाईट केले जात आहे, खरे तर त्यानंतर त्यांनी दिलेल्या स्पष्टीकरणात म्हटले आहे की, माज्या पक्षाचा झेंडा भगवा असता तर मी मुंब्रा भगवा करेन असेही म्हटले असते. त्यामुळे ते वाक्य आता त्या ज्या पक्षात आहेत, त्या एमआयएमच्या विस्ताराच्या दृष्टीने आहे. कारण त्यांच्या पक्षाचा झेंडा हिरवा आहे.

जेव्हा मुख्यधारेतील पक्ष एका समाजाला अप्रत्यक्षपणे निवडणुकीच्या राजकारणातून बॉयकॉट करत असतील, बाजूला पाडत असतील तेव्हा त्यांनी समविचारी लोकांना सोबत घेऊन आपले प्रतिनिधी आपल्या समस्या मांडण्यासाठी, आपला आवाज बुलंद करण्यासाठी लोकशाहीच्या मंदिरात पाठवले तर त्यात आक्षेप घेण्याचे कारण काय? जेव्हा प्रस्थापित पक्ष एका समूहाला दुय्यमत्व बहाल करत आहे, त्यांना मुळ प्रवाहात सामावून घेण्यास स्पष्ट नकार देत आहेत, तेव्हा त्यांनी त्यांचा लोकशाही मार्ग निवडला आहे. मात्र त्यात त्यांनी धार्मिक कट्टरता आणली तर त्याला विरोध झालाच पाहिजे. मात्र त्याआधीच त्यांच्याबद्दलचे कोट अन्कोट ग्रह तयार करून फुली मारणे चुकीचेच म्हणावे लागेल. एमआयएमचे मुंबईत आठ नगरसेवक विजयी झाले आहेत. त्यांनी गटनेतेपदी विजय उबाळे यांची निवड केली. मुंबईतील वॉर्ड क्रमांक १४० मधून विजयी झालेले विजय उबाळे पेशाने शिक्षक आहेत. असदुद्दीन ओवैसींच्या पक्षाचे मुंबईत आठ नगरसेवक निवडून आले, त्यातील सात मुस्लीम आहेत. मात्र अतिशय हलाकीच्या स्थितीतील विजय उबाळे यांची गटनेतेपदी निवड करून आम्ही सर्वधर्मीय उमेदवारांना उमेदवारी दिली आहे, तसेच पक्षात सेक्युलॅरिझम असल्याचा संदेश देण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. गोवंडी येथे खासगी कोचिंग क्लास चालवत उदरनिर्वाह कर्णाया विजय उबाळे यांना उमेदवारी देणे आणि त्यानंतर गटनेतेपदी त्यांची निवड, ही दलित मतदारांना आकर्षित करण्याची त्यांची रणनीती आहे.

२०१९च्या लोकसभा निवडणुकीत वंचित बहुजन आघाडी आणि एमआयएम हे दलित-मुस्लीम समीकरण राज्यात यशस्वी झालेले दिसून आले होते. या समीकरणामुळे २५ वर्षांचा शिवसेनेच्या बालेकिल्ल्यात इम्तियाज जलील लोकसभेला विजयी झाले होते. मात्र त्याचवेळी वंचितचे सर्वेसर्वा प्रकाश आंबेडकर यांचा सोलापूर आणि अकोला या दोन्ही मतदारसंघात पराभव झाला होता. यानंतर लागलीच झालेल्या विधानसभा निवडणुकीत जागावाटपावरून ही आघाडी फिस्कटली. दलित आणि मुस्लीम समीकरणाचा हा प्रयोग राज्यात आणखी काही काळ चालला असता तर विरोधी पक्षाची पोकळी त्यांनी नक्कीच भरून काढली असती हे कालच्या संभाजीनगरच्या निकालावरून दिसून येते. संभाजीनगरमध्ये एमआयएमचे ३३ नगरसेवक विजयी झाले. मुख्य विरोधीपक्ष म्हणून तिथे ते काम करतील. यामध्ये सर्व ३३ नगरसेवक हे काही मुस्लीम नाहीत, यामध्ये एससी, एसटी आणि ओबीसीदेखील आहेत. या निवडणुकीच्या निमित्ताने किमान स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पातळीवर अल्पसंख्याक समाजाने आपला पक्ष निवडला आहे, असे चित्र निर्माण झाले आहे. नगरपालिका निवडणुकीत अकोटमध्ये भाजपलाही एमआयएमची मदत घ्यावी लागली होती, वास्तविक ही युती औटघटकेची ठरली. महापालिका निवडणुकीनंतर आता महापौरपदाचे आरक्षण जाहीर झाले आहे. त्यामध्ये अनेक ठिकाणी भाजपला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी कॉंग्रेस, शिवसेना (ठाकरे) आणि एमआयएम एकत्र येत असल्याचे चित्र दिसत आहे.

आता राज्यातील निळ्या वादळाबद्दलही बोलले पाहिजे. महापालिका निवडणुकीत वंचित बहुजन आघाडी सोडली तर एकाही आंबेडकरवादी पक्षाला यश मिळालेले नाही. २०१४ पासून सत्तेत सहभागी असलेले रामदास आठवले यांच्या पक्षाला स्वतःचे उमेदवारही या निवडणुकीत उभे करता आले नाही. वंचितला राज्यात ३० जागांसह किंचित यश मिळाले, मात्र राज्यात एकही महापालिका त्यांना ताब्यात घेता आली नाही. कॉंग्रेससोबत आघाडी केली असल्यामुळे लातूरमध्ये दोन्ही पक्षांना त्याचा फायदा झाला, मात्र मुंबईसारख्या मेट्रोपॉलिटन शहरात आज वंचितचा एकही नगरसेवक नाही, ही नामुष्की आली आहे. राज्यात भाजप आणि वंचित हे दोनच पक्ष आहेत जे सर्व जागा लढवू शकतात, असे म्हणणाऱ्या वंचितच्या नेत्यांना मुंबईत ६०-६५ जागांवरही उमेदवार उभे करता आले नाही. ४१ जागा लढवून एकही जागा जिंकता आली नाही. आंबेडकरवादी कार्यकर्त्यांना राज्यातील प्रस्थापित पक्ष फारशी उमेदवारी देत नाही असे चित्र आता समोर येत आहे. त्यामुळे वंचितकडे ओढा वाढला आहे. मात्र सत्तेत सहभागी असताना रामदास आठवलेंची स्थिती ही ना घर का ना घाट का, अशी आहे. मुंबईत अनुसूचित जाती प्रवर्गासाठी १५ मतदारसंघ आरक्षित आहेत. या सर्व १५ मतदारसंघांमध्ये प्रस्थापित पक्षांनी बाजी मारली. त्यामुळे केंद्रीय मंत्री रामदास आठवले, प्रा. जोगेंद्र कवाडे, आनंदराज आंबेडकर हे फक्त सत्तेचे भोई झाले आहेत, त्यांना जनाधार मिळताना दिसत नाही. याउलट वंचित घटकातील विविध जाती समूहाला एकत्र आणून स्वतःची व्होटबँक तयार करण्यात प्रकाश आंबेडकर यशस्वी झालेले असले तरी यशाच्या भोज्याला अजून त्यांनी शिवलेले नाही, हेही वास्तव आहे.

# सोने-चांदी कशामुळे भडकली!

भारतीय कुटुंब आणि संस्कृतीमध्ये सोने आणि चांदी या धातूंना खूप महत्त्व आहे. लग्नगाठ बांधताना (साखरपुडा), लग्न अशा सोहळ्यांमध्ये सोने-चांदीची खरेदी, दागिने केले जातात. शिवाय आपल्या देशात सोने खरेदीचे खास मुहूर्तदेखील आहेत. केवळ महाराष्ट्रातच नाही तर देशात अक्षय तृतीया, बलिप्रतिपदा, गुढीपाडवा आणि दसरा हे साडेतीन मुहूर्त आहेत. या चारही दिवशी सोने-चांदीसह मौल्यवान वस्तू खरेदी केल्या जातात. हे सर्व सांगण्याचे कारण म्हणजे सोन्याचे वाढलेले दर. नवीन वर्ष सुरू झाल्यापासून सोन्याच्या दरात प्रति तोळा (१० ग्रॅम) २२ हजार रुपयांची वाढ झाली आहे. तर चांदीने प्रतिकिलो साडेतीन लाख रुपयांची वेस ओलांडली आहे. सोन्या-चांदीचे दर वाढण्याची कारणे वेगवेगळी असली तरी भारतीयांच्या जीवनावर त्याचा मोठा आर्थिक आणि सामाजिक परिणाम होत आहे, हे वास्तव आहे. सध्या लग्नसराई सुरू आहे. पुढील महिन्यात म्हणजे फेब्रुवारीमध्ये लग्नाचे अनेक मुहूर्त आहेत. या पार्श्वभूमीवर सोने आणि चांदीमुळे लग्नाच्या खर्चात प्रचंड वाढ होत आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. आपण किमान एक वर्षे मागे गेलो तरी सोन्याचे दर दुप्पट झाल्याचे लक्षात येते. जे सोन्याचे होत आहे तेच चांदीच्या दराचे होत आहे. अगदी उदाहरण द्यायचे तर १ जानेवारी २०२५ रोजी २४ कॅरेट सोन्याचा दर ७६ हजार ३८० रुपये होता. एक वर्षात म्हणजे १ जानेवारी २०२६ रोजी सोन्याचा भाव १ लाख ३५ हजार ६० रुपये झाला होता. म्हणजे अवघ्या ३६५ दिवसांत सोन्याचे दर ५८ हजार ६८० रुपयांनी वाढले. याचाच अर्थ सोन्याचा भाव चंद्राच्या कलेप्रमाणे रोज १६१ रुपयांनी वाढत होता. २१ जानेवारी २०२६ रोजी सोन्याचा दर १ लाख ५४ हजार ८०० रुपये झाला होता. म्हणजे अवघ्या एका वर्षात सोन्याचे दर दुपट्टीपेक्षा जास्त वाढले आहेत. या पार्श्वभूमीवर ज्या घरात विवाह आहेत, त्यांच्या लग्नखर्चात अमाप वाढ झाली आहे. एका लग्नात वधू-वर यांच्यासाठी अंदाजे ८ तोळे सोन्याची खरेदी केली जाते. यात वधूसाठी मंगळसूत्र, कान आणि नाकातील अलंकार, अंगठी तर वरासाठी अंगठी यांचा समावेश आहे. सोन्याची खरेदी, त्यावरील जीएसटी, त्याचे दागिने घडवण्याचा खर्च हे सर्व लक्षात घेतले तर आजच्या भावाप्रमाणे साडेतेरा लाख रुपयांपर्यंत खर्च येतो. शिवाय लग्नसोहळ्यातील इतर खर्च वेगळा. म्हणजेच सोने-चांदीच्या चढत्या दराने वधू-वर कुटुंबांना खर्चाच्या खाईत टाकले आहे. मात्र, सामाजिक स्तर राखण्यासाठी अगदी गरीब कुटुंबांनाही कर्ज काढून मुला-मुलींच्या लग्नात सोन्यावर एवढा प्रचंड खर्च करावा लागत आहे. आता प्रश्न उपस्थित होत आहे की, सोन्याचे दर रोज एवढी उसळी का घेत आहेत? यामागे प्रमुख कारण आहे ते आंतरराष्ट्रीय राजकीय अस्थिरतेचे! जागतिक तणाव, कधी इस्रायल-हमास युद्ध तर कधी रशिया-युक्रेन यांच्यातील लढाई तर आता पेटलेला ग्रीनलँडचा वाद, काही देशांच्या प्रमुखांच्या रोज बदलणाऱ्या भूमिका आणि धोरणे यामुळे सोन्याच्या दरावर परिणाम होत आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा ग्रीनलँड जोडण्याचा आग्रह आणि याच मुद्द्यावरून युरोपीय देशांना कर लावण्याची ट्रम्प यांची धमकी यामुळे जागतिक बाजारपेठेत अस्थिरता वाढली आहे. यामागची मानसिकता अशी आहे की, जेव्हा व्यापार युद्धाचा धोका वाढतो तेव्हा शेअर बाजार अस्थिर होतो आणि कोलमडतो. यातून सावरण्यासाठी गुंतवणूकदार शेअर बाजारातून पैसे काढून घेतात आणि सोन्यासारख्या सुरक्षित गुंतवणुकीला महत्त्व आणि प्राधान्य देतात. अडीच-तीन वर्षांपासून जगभरात अशीच परिस्थिती पाहायला मिळत आहे. जागतिक व्यवहार डॉलरमध्ये होत असल्याने आणि आपल्याकडे डॉलरच्या तुलनेत रुपया दिवसेंदिवस गडगडत असल्याने सोन्याच्या भावाला आणखी झळाळी मिळत आहे. त्यातच आंतरराष्ट्रीय बाजारात खरेदी केलेल्या सोन्याचा भारतात आणण्याचा खर्च अव्वाच्या सव्वा असल्यामुळे भारतात सोन्याच्या भावाने मोठी उंची गाठली आहे. आणखी एक महत्त्वाचे कारण म्हणजे जशी भारताची रिझर्व्ह बँक आहे तशीच प्रत्येक देशाची मध्यवर्ती बँक असते. या बँका त्यांच्याकडील परकीय चलनाचा साठा सुरक्षित ठेवण्यासाठी मोठ्या प्रमाणात सोने खरेदी करत असतात. ही स्थिती जगभरात असल्यामुळे अर्थशास्त्राच्या नियमानुसार मागणी जास्त आणि पुरवठा कमी होते. परिणामी सोन्याचे दर वाढत आहेत. त्यातच डोनाल्ड ट्रम्प यांच्यासारखे अमेरिकेचे वाचाळ अध्यक्ष मनात येईल तेव्हा दुसऱ्या देशावर टॅरिफ लादत आहेत. मध्य पूर्वेतील वाढता तणाव याचा सोन्याच्या भावावर मोठा परिणाम होत आहे. म्हणूनच सोने दरवाढीचा वेग लक्षात घेतला तर यंदा सोन्याचे भाव १ लाख ९० हजार रुपयांपर्यंत जाऊ शकतात. तसेच चांदीचे दर ४ लाख रुपयांवर जाण्याची शक्यता आहे. यामुळे विवाहोच्छुकांना मोठी आर्थिक झळ सहन करावी लागणार आहे. अडीअडचणीला सोने तारण ठेवून कर्ज घेता येते, सोने-चांदी विकून लगेच पैसे मिळवता येतात यामुळे सोन्याला मोल आहे. सोन्याचा भाव यापूर्वीही वाढत होता. मात्र, मागील तीन वर्षांत झालेली वाढ लक्षणीय म्हणावी लागेल. एवढे असूनही लग्नसराईत सोने कितीही महाग असले तरी सोने खरेदी तेवढ्याच उत्साहाने केली जाते, सोन्याचे दागिने मिरवले जातात आणि त्याचा आनंदही साजरा केला जातो. कारण ते निव्वळ सोने नसते ती भावनिक गुंतवणूकदेखील असते.

# 'जेन झी'कडे भाजपचे नेतृत्व

**बिहारमधील राजकीय घडामोडींची खडानखडा माहिती असणाऱ्या नितीन नबीन यांच्यावर राष्ट्रीय अध्यक्षपदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. जगातील सर्वाधिक सदस्य असलेल्या भाजपला आता दक्षिणायन करून तामिळनाडू, केरळ, पुदुचेरी आणि पश्चिम बंगाल पादाक्रांत करायचा आहे. अर्थात मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या छत्रछायेखाली कारभार चालणार असल्यामुळे त्यांना ताण घेण्याचे काहीच कारण नाही.**

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारविरोधात जेन झीने आवाज उठवण्याचे आवाहन केले होते. जगभर आता जेन झी क्रांतीची मशाल हाती घेत असताना भारतातही तसे व्हावे, अशी राहुल यांची इच्छा असली, तरी राहुल यांच्या पक्षाची धुरा अजूनही ज्येष्ठांच्या हातात आहे. निवडणूक जिंकून द्यायला युवक आणि पदे मात्र ज्येष्ठांना, यामुळे तर कॉंग्रेसला कर्नाटक, मध्य प्रदेश, राजस्थान आदी राज्यांमध्ये फटका बसला. यालट, सत्तेतील महत्त्वाची पदे भाजपची ज्येष्ठ मंडळी भूषवत असली, तरी संघटनात्मक तसेच अन्य पदांवर युवक आणि मध्यमवयीन नेत्यांची वर्णी लावून भाजपने संतुलन साधले. आता मोदी हेही जेन झीला आकर्षित करत आहेत. पश्चिम बंगालमधील त्यांचे भाषण ऐकल्यास त्यात त्यांनी युवकांच्या भावनांना हात घातलेला दिसतो. दिल्लीत मोदी यांच्याविषयी आयोजित पुस्तक प्रदर्शनामागेही जेन झीच्या भावनांचा उद्रेक न होता ते आपल्याबरोबर कसे राहतील, ही व्यूहनीती होती. आता त्याचे पुढचे पाऊल म्हणून जगातील सर्वात मोठ्या राजकीय पक्षाची धुरा ४५ वर्षांच्या नितीन नबीन यांच्या खांद्यावर देण्यात आली. त्यांची राष्ट्रीय अध्यक्षपदी झालेली बढती भाजपमध्ये एका पिढीतील बदलाचे संकेत देते. नबीन यांना नवे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून नियुक्त करण्याचा भाजप पक्षश्रेष्ठींचा निर्णय केवळ एक महत्त्वाचा संघटनात्मक निर्णय नाही, तर राष्ट्रीय राजकारणाला एक स्पष्ट संदेशदेखील देतो. भाजपमध्ये नेतृत्वाचा मार्ग वय किंवा वंशावळीने नव्हे, तर कठोर परिश्रम, ऊर्जा आणि संघटनात्मक क्षमतेने ठरवला जातो, हा या निवडीमागील संदेश आहे. केवळ ४५ वर्षांच्या नबीन यांच्याकडे ही जबाबदारी सोपवून पक्षाने सिद्ध केले आहे, की भाजप भविष्यातील राजकारणावर लक्ष ठेवून तरुण नेतृत्व जोपासते. दुसरीकडे, कॉंग्रेसचे नेतृत्व ८३ वर्षीय मल्लिकार्जुन खरगे यांच्या खांद्यावर आहे. नबीन यांची नियुक्ती ही केवळ एक नियुक्ती नाही, तर पक्षामध्ये पिढ्यानपिढ्या होणाऱ्या बदलांचे प्रतीक आहे. १९८० मध्ये स्थापनेपासून, पक्षाने अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, मुरली मनोहर जोशी आणि कुशाभाऊ ठाकरे यांसारख्या नेत्यांच्या नेतृत्वाखाली आपला वैचारिक आणि संघटनात्मक पाया मजबूत केला. त्यांच्यापाठोपाठ, नरेंद्र मोदी, राजनाथ सिंह, व्यंकय्या नायडू, अरुण जेटली, सुषमा स्वराज, नितीन गडकरी, जे. पी. नड्डा आणि अमित शहा यांच्यासह दुसऱ्या पिढीने, तर धर्मेंद्र प्रधान, भूपेंद्र यादव, देवेंद्र फडणवीस, योगी आदित्यनाथ, प्रल्हाद जोशी आणि अनुराग ठाकूर यांच्यासह तिसऱ्या पिढीने पक्षाच्या संघटनात्मक रचनेचा विस्तार केला आणि पक्षाला सत्तेत आणले. आता चौथी पिढी म्हणून भाजपने नबीन यांची निवड केली आहे. नबीन हे भाजपचे सर्वात तरुण राष्ट्रीय अध्यक्ष आहेत. यापूर्वी अमित शहा यांनी ४९व्या वर्षी पक्षाची सूत्रे हाती घेतली होती. त्यांच्यापूर्वी नितीन गडकरी ५२व्या वर्षी अध्यक्ष झाले होते.

ताज्या निवडीने भाजपने तरुणांना थेट संदेश दिला आहे, की वय हा पक्षात अडथळा नाही. नबीन हे कायस्थ समुदायातून येतात. त्यांची संख्या निवडणुकीच्या राजकारणात निर्णायक मानली जात नाही. असे असूनही, त्यांना पक्षाच्या सर्वोच्च पदावर नियुक्त केल्याने दिसून येते, की भाजप नेतृत्व निवडीमध्ये जातीच्या अंकगणितापेक्षा संघटनात्मक क्षमता आणि राजकीय समजुतीला प्राधान्य देत आहे. संघटनेत काम करणारा, जमिनीशी जोडणारा आणि निवडणूक आव्हाने समजून घेणारा कार्यकर्ता वरच्या स्थानी पोहोचू शकतो. प्रादेशिक संतुलनाच्या दृष्टिकोनातून नबीन यांची निवड महत्त्वाची आहे. ते बिहारचे आहेत आणि भाजपचे पूर्व भारतातून येणारे पहिले राष्ट्रीय अध्यक्ष आहेत. यावरून स्पष्ट होते, की पक्षाचे लक्ष हिंदी पट्ट्यापुरते किंवा पश्चिम भारतापुरते मर्यादित नाही. भाजप बिहार, बंगाल, ओडिशा, आसाम आणि ईशान्येकडील राज्यांमध्ये आपली पकड मजबूत करू इच्छित आहे. नबीन यांचा अध्यक्षपदाचा कार्यकाळ तीन वर्षांचा आहे, परंतु २०२९ च्या लोकसभा निवडणुका त्यांच्या नेतृत्वाखाली लढवल्या जातील हे निश्चित आहे. त्यांच्या आधी पक्षाने लोकसभा निवडणुका लक्षात घेऊन शहा आणि नंतर नड्डा यांचा अध्यक्षपदाचा कार्यकाळ वाढवला होता. म्हणूनच त्यांची टीम तरुण आणि अनुभवी नेत्यांमध्ये संतुलन राखत असल्याचे म्हटले जाते. पक्ष संघटनेत महिलांसाठी ३३ टक्के प्रतिनिधित्वाची तरतूद असून नवीन टीममध्ये महिला आणि तरुण चेहऱ्यांना आघाडीवर आणण्याची योजना आहे. मोदी यांच्या नेतृत्वाखाली भाजपच्या नेतृत्वाखालील 'एनडीए' सरकार बारा वर्षांपासून सत्तेत असताना नबीन यांनी पक्षाचे नेतृत्व स्वीकारले. पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुका याच वर्षी होणार आहेत. ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील तृणमूल कॉंग्रेस बंगालमध्ये १५ वर्षांपासून सत्तेत आहे. बिहार आणि ओडिशानंतर, भाजपचे पूर्वेकडील सर्वात मोठे आव्हान म्हणजे बंगालमध्ये कमळ फुलवणे. तामिळनाडू, केरळ आणि पुद्दुचेरी विधानसभा निवडणुका याच वर्षी होणार आहेत. भाजप केरळमध्ये वीस टक्के मते मिळवत आहे; परंतु त्याचा उपयोग जागा जिंकण्यात होत नाही. तिरुवनंतपुरममध्ये भाजपने महापौरपदाची निवडणूक जिंकली आहे. पक्ष तिसरी शक्ती बनण्याचा प्रयत्न करत आहे. तामिळनाडू विधानसभेच्या निवडणुकाही लवकरच होणार आहेत. तिथे द्रमुक-कॉंग्रेस युती दहा वर्षांपासून सत्तेत आहे. अण्णाद्रमुक आणि इतर पक्षांशी युती करून पक्ष पुन्हा सत्तेत येण्याचा प्रयत्न करत आहे. पुद्दुचेरीमध्ये सत्ता टिकवून ठेवणेदेखील आव्हानात्मक आहे. देशातील ६५ टक्के लोकसंख्या सध्या ३५ वर्षांपेक्षा कमी वयाची आहे. भाजप अध्यक्ष म्हणून नबीन यांच्यावर भाजपचा पाठिंबा राखण्याची महत्त्वाची जबाबदारी असेल. नबीन यांची नियुक्ती तळागाळातून सुरू झालेल्या आणि राष्ट्रीय पातळीपर्यंत पोहोचलेल्या व्यापक अंतर्गत निवड प्रक्रियेचा परिणाम आहे. ही नियुक्ती भाजपच्या संघटनात्मक ताकदीचे आणि आगामी महत्त्वाच्या राज्यातील निवडणुकांपूर्वी बदलावर भर देण्याचे लक्षण म्हणून पाहिली जाते. त्यांनी बिहारमधील पक्षाच्या युवा संघटनेपासून सुरुवात केली आणि निवडणुकीच्या जबाबदाऱ्या स्वीकारत उच्च पदांवर पोहोचले. यातील एक महत्त्वाची कामगिरी म्हणजे छत्तीसगड तसेच दिल्लीमध्ये भाजपला पुन्हा सत्तेत आणण्यामध्ये नबीन यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

कधीतरी उपमा जास्त होतो आणि उरतो. मग तो गारगुट्ट उपमा कोणीच खात नाही. काही वेळा ताजा उपमाही उरतो. कारण तो दडदडीत किंवा घट्ट होतो जो अजिबात खाल्ला जात नाही. अशा वेळी हा उपमा फुकट घालवण्यापेक्षा त्यापासून एक भन्नाट नाश्त्याचा पदार्थ बनवला तर...

## उपमा कटलेट्स



**साहित्य** – उरलेला उपमा १ वाटी (त्यात काजू असतील तर काढून टाका.) उकडलेला आणि किसलेला बटाटा अर्धी वाटी, चाट मसाला, आवडीप्रमाणे तिखट, थोडा ओवा, मीठ, साखर.

**कृती** – सर्व साहित्य एकत्र करून घ्यावे. लक्षात ठेवा मिश्रण पातळ नको तर घट्ट हवं. त्याचे छोटे छोटे गोळे अथवा टिक्की करून आवडीप्रमाणे तळून किंवा भाजून घ्यावे. याच्या टिक्की किंवा कटलेट नीट वळता येत नसतील तर अर्धा तास ते मिश्रण फ्रीजमध्ये उघडे ठेवावे.

## फेशियल करताना अशी घ्या काळजी

**आपल्या चेहऱ्याची काळजी घेताना चेहरा नेहमी सुंदर आणि त्वचा नितळ, चमकदार राहावी, अशी इच्छा केवळ स्त्रियांनाच नाही, तर पुरुषांनाही असते. त्यामुळे 'फेशियल', किंवा फेशियल क्लीनअप व मसाज ही थेरपी लोकप्रिय आहे. चेहऱ्याचे सौंदर्य वाढवण्याबरोबरच चेहऱ्यावरील सुरकुत्या कमी करत त्वचेवरील मृत पेशी, ब्लॅक हेड्स आणि व्हाईट हेड्स नाहीसे करण्याचे काम फेशियल थेरपी करत असते. मात्र ही थेरपी घेताना योग्य काळजी घेतली गेली नाही, तर चेहऱ्याला नुकसान होण्याची शक्यताच अधिक असते. त्यामुळे फेशियल थेरपी निवडताना काही गोष्टी लक्षात ठेवणे आवश्यक आहे.**



**काही** लोकांची त्वचा तेलकट असते. अशा व्यक्तींना चेहऱ्यावर मुरुमे अधिक येत असतात. अशा व्यक्तींच्या फेशियल थेरपीसाठी तेलयुक्त क्रीम्स वापरली गेली, तर त्वचा अधिक तेलकट होऊन मुरुमे वाढू शकतात.

तेलयुक्त क्रीम्स वापरली गेल्याने त्वचेवरील रंध्रे बंद होऊन पिंपल्स येण्याचे प्रमाण वाढू शकते. तेलकट त्वचा असणाऱ्या व्यक्तींनी फेशियलसाठी वॉटर बेस्ड क्रीम्सचा वापर करणे चांगले.

फेशियल थेरपीसाठी वापरण्यात येणारे प्रोडक्ट आपल्या नेहमीच्या वापरातील नसून, नवे असल्यास त्याची 'पॅच टेस्ट' करून पाहणे चांगले. या टेस्टद्वारे आपण वापरणार असलेल्या क्रीमचे कोणत्याही प्रकारचे दुष्परिणाम आपल्या त्वचेवर होणार नाहीत याची खात्री आपल्याला करून घेता येते. ही टेस्ट करण्यासाठी थोडेसे क्रीम आपल्या मनगटाच्या आतील बाजूस लावून पाहावे. चोवीस तासांच्या नंतर या क्रीमचा कोणताही दुष्परिणाम जाणवला नाही, तरच हे क्रीम चेहऱ्यावर लावण्यास योग्य आहे, असे समजून त्याचा फेशियल थेरपीसाठी वापर करावा.



फेशियल थेरपी एखाद्या ब्युटी सलोनमध्ये किंवा पार्लरमध्ये जाऊन करणार असल्यास तेथील स्वच्छता, फेशियलच्या दरम्यान वापरण्यात येणारे टॉवेल, नॅपकिन, स्टीमर आणि इतर उपकरणे स्वच्छ असल्याची खात्री करून घेणे आवश्यक आहे. जर या वस्तू स्वच्छ आणि निर्जंतुक केलेल्या नसतील तर त्याद्वारे त्वचेला इन्फेक्शन होण्याचा धोका असतो. तसेच फेशियल करताना आपल्यासाठी वापरण्यात येणारे फेशियल कीट संपूर्णपणे नवीन आणि आधीपासून वापरलेली नाही याची खात्री करून घ्यावी.

आजकाल फेशियल कीटमध्ये सर्व प्रसाधने लहान लहान पाऊचेसमध्ये उपलब्ध असल्याने प्रोडक्ट आधी वापरले गेले आहे किंवा नाही याची सहज खात्री करून घेता येते.

फेशियलसाठी वापरण्यात येणाऱ्या अनेक प्रसाधानांमध्ये किंवा क्रीम्समध्ये अनेक प्रकारची रसायने असतात. या रसायनांमुळे त्वचा कोरडी होणे, त्वचेला खाज सुटणे, त्वचा लालसर होणे, अशा समस्या उद्‌भवू शकतात. त्यामुळे फेशियलसाठी शक्यतो संपूर्णपणे नैसर्गिक वस्तूंचा वापर करणे केव्हाही चांगले. फेशियल थेरपी केल्यानंतर उन्हामध्ये बाहेर पडणे किंवा साबणाचा वापर टाळावा.

फेशियल थेरपीनंतर त्वरित सौंदर्यप्रसाधनांचा वापरही करू नये. फेशियल केल्यानंतर त्वचेची रंध्रे खुली असतात. त्यामुळे सौंदर्य प्रसाधानांमधील रसायने या रंध्रांच्या वाटे त्वचेच्या आत शिरून त्वचेचे नुकसान करू शकतात.

फेशियलनंतर चेहरा धुण्यासाठी साबण किंवा फेसवॉशचा वापर न करता केवळ थंड पाण्याने चेहरा धुवावा.

## घरचा वैद्य जाणून घ्या ५ उपाय

▮ **कांदा** – कानाच्या वेदनेमुळे त्रस्त आहात, तर घाबरण्यासारखे काही नाही. कांद्याच्या रस काढून कापसाच्या मदतीने कानात दोन ते तीन थेंब टाका. काही वेळातच आराम मिळेल.



▮ **हळद** – शारीरिक वेदनांपासून मुक्ती मिळवण्यासाठी गरमागरम दुधात हळद मिसळून सेवन करा. याव्यतिरिक्त तेल आणि हळद गरम करून शरीर-ावर लावल्यानेही लाभ मिळेल.

▮ **लसूण** – हे अँटीबॅक्टेरिअल आणि अँटी इंफ्लेमेटरी तत्त्वाने भरपूर औषध आहे, ज्याने उष्णताही प्राप्त होते. शारीरिक वेदनेत लसूण सर्वोत्तम विकल्प आहे. याव्यतिरिक्त कानात वेदना होत असल्यास लसणाच्या तेलाचे काही थेंब टाकल्याने आराम मिळतो.

▮ **लवंग** – दातदुखीवर लवंग सर्वोत्तम उपाय आहे. भाजलेल्या लवंगाची पेस्ट किंवा लवंग तेल कापसाने दाताला लावल्याने वेदनांपासून मुक्ती मिळेल.

▮ **दालचिनी** – याने विशेषतः महिलांना मासिक पाळीदरम्यान होणाऱ्या त्रासापासून मुक्ती मिळते. अधिक रक्तस्त्राव होत असल्यास दालचिनी लाभकारी ठरेल. केवळ दालचिनी टाकून चहा बनवा किंवा तयार चहामध्ये दालचिनी पावडर टाकून सेवन करा.

## कर्करुग्णांसाठी जीवनसत्त्व 'ड' लाभदायक

कर्करोग झालेल्यांनी किमान तीन वर्षे नियमितपणे जीवनसत्त्व 'ड'ची मात्रा घेतल्यास ते जगण्याचा कालावधी आणखी काही वर्षे वाढू शकतो, असे एका अभ्यासात दिसून आले आहे. याबाबत अमेरिकेतील मिशिगन स्टेट विद्यापीठातील संशोधकांनी अभ्यास केला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, जीवनसत्त्व 'ड'मुळे हाडे मजबूत होण्याबरोबरच आणखीही महत्त्वपूर्ण लाभ होतात.



मिशिगन स्टेट विद्यापीठाचे तारेक हायकल यांनी सांगितले की, जीवनसत्त्व 'ड'च्या सेवनामुळे कर्करोग झालेल्या व्यक्तींमध्ये मृत्यूची जोखीम कमी झाल्याचा परिणाम चांगल्या प्रकारे दिसून येतो. पण त्याच वेळी या जीवनसत्त्वामुळे कर्करोगाला प्रतिबंध होऊ शकतो, असे दाखवणारा कोणताही पुरावा मिळू शकलेला नाही.

या संशोधकांनी कर्करोग प्रतिबंधाचे उपचार झालेल्या ७९ हजारांहून अधिक रुग्णांची माहिती तपासली. ही माहिती विविध अभ्यासात नोंदवण्यात आली होती. या अभ्यासात जीवनसत्त्व 'ड'ची मात्रा घेणारे रुग्ण आणि मानसिक लाभासाठी औषधोपचार घेतलेल्या रुग्णांची तुलना करण्यात आली होती. हा कालावधी किमान तीन वर्षांचा होता. यात कर्करोग झाल्यानंतर मृत्यू झालेल्यांवर लक्ष केंद्रित करण्यात आले. या संशोधनात असे दिसून आले की, जीवनसत्त्व 'ड' घेणारे रुग्ण आणि मानसिक लाभासाठी औषधोपचार केलेले रुग्ण यांच्यातील मृत्यूच्या प्रमाणात मोठा फरक आहे. जीवनसत्त्व 'ड' हे कर्करुग्णांसाठी किती महत्त्वपूर्ण ठरते, हे यातून दिसून आले, असे हायकल म्हणाले. असे असले तरी जीवनसत्त्व 'ड'ची नक्की किती मात्रा घ्यावी आणि त्याची रक्तातील पातळी किती असावी, ही माहिती यात मिळाली नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## व्हॉट्सअ‍ॅपवर 'या' नंबरवरून फोन आला तर अजिबात उचलू नका! बँक अकाऊंट होईल रिकामे

व्हॉट्सअ‍ॅपचा वापर आपण सर्वच जण मोठ्या प्रमाणात करत असतो. एक इन्स्टंट मेसेजिंग अ‍ॅप म्हणून व्हॉट्सअ‍ॅप बेस्ट आहे. आपल्या नॉर्मल गप्पाटप्पांपासून ते ऑफिसची महत्त्वाची कामेही आपण या व्हॉट्सअ‍ॅपवर करत असतो. पण हे अ‍ॅप जेवढं उपयुक्त आहे तेवढंच धोकादायक आहे. आजकाल व्हॉट्सअ‍ॅपद्वारे कितीतरी स्कॅम होत असून अनेकजण यात फसले जात आहेत. आता आणखी एक नवीन प्रकरण समोर आले आहे. अनेकांना आंतरराष्ट्रीय नंबरवरून अचानक कॉल येत आहेत.

हे कॉल्स इथिओपिया (+251), मलेशिया (+60), इंडोनेशिया (+62), केनिया (+254), व्हिएतनाम (+84) आणि इतर यांसारख्या वेगवेगळ्या देशांचे आहेत. तर व्हॉट्सअ‍ॅप कॉल हे इंटरनेटद्वारे केले जातात. काही मीडिया रिपोर्ट्सनुसार, काही स्कॅम एजन्सी कार्यरत आहेत ज्या व्हॉट्सअ‍ॅप कॉलसाठी आंतरराष्ट्रीय नंबर विकत आहेत. कोणत्याही आंतरराष्ट्रीय कॉल शुल्काची चिंता न करता या क्रमांकांवरून कॉल करू शकतात. अशाप्रकारच्या कॉल्समुळे तुमचा फोन हॅक होऊ शकतो, तुमचे बँकिंग डिटेल्सही समोरच्यांकडे जाऊ शकतात आणि तुमचं बँक खातं मोकळं होऊ शकतं. ट्विटरवरील अनेक वापरकर्त्यांनी आंतरराष्ट्रीय नंबरवर एकापेक्षा जास्त वेळा कॉल येत असल्याचं सांगितलं आहे. जर तुमच्या बाबतीतही असेच होत असेल आणि तुम्हाला या समस्येपासून मक्ती मिळवायची असेल, तर तुम्हाला या नंबरवरून येणाऱ्या कॉल्सकडे दुर्लक्ष करावे लागेल. जर तुम्हाला अचानक एखाद्या आंतरराष्ट्रीय नंबरवरून कॉल दिसला तर तो ताबडतोब डिस्कनेक्ट करा. हा नंबर देखील ब्लॉक करा. ते तुमची वैयक्तिक माहिती चोरू शकतात आणि तुम्ही तुमचे बँक खाते साफ करू शकतात.

**जर तुम्हाला देखील सतत काही ठरावीक आंतरराष्ट्रीय नंबर्सवरून व्हॉट्सअ‍ॅपवर कॉल किंवा मेसेज येत असेल तर तुम्हाला सावध होण्याची गरज आहे. कारण हा तुमच्यासोबत स्कॅम असू शकतो.**



**हा व्हॉट्सअ‍ॅप स्कॅमही चर्चेत**

**लोकांना व्हॉट्सअ‍ॅप मेसेजद्वारे नोकऱ्या दिल्या जात असल्याचे मेसेज येत आहेत. हे लोक कोणत्या ना कोणत्या कंपनीचे असल्याचा दावा करतात आणि दररोज पैसे पुरवण्याची चर्चा करतात. घरबसल्या आरामात काम करता येतं असं म्हणतात. एकदा वापरकर्त्यांना त्यांचे पैसे मिळाले की ते स्कॅमरवर विश्वास ठेवू लागतात आणि मोठ्या घोटाळ्यात अडकतात. अशा घटना यापूर्वीही समोर आल्या आहेत. अशा प्रकरणांपासून दूर राहण्याचीही गरज आहे.**



## सर्व काही आरोग्यासाठी

**स्त्रीचे** आरोग्य म्हणजे फक्त गर्भारपण व बाळंतपणाच्या वेळचे आरोग्य नव्हे. खरे म्हणजे त्या वेळचे आरोग्य जर सर्व दृष्टीने सुदृढ राखावयाचे असेल तर त्याची काळजी तिच्या जन्मापासूनच घेतली पाहिजे. सुदृढ स्त्रीच सुदृढ आणि कार्यक्षम माता होऊ शकते. म्हणूनच स्त्रीच्या आरोग्याची काळजी व त्यासाठी लागणाऱ्या सुविधा तिला जन्मापासून मिळाल्या पाहिजेत. आयुष्याच्या सर्व टप्प्यांत सुदृढ असलेली स्त्री स्वतः तर स्वावलंबी बनेलच, पण समाजविकासाच्या कार्यालाही हातभार लावील. म्हणून सर्वांनी एकत्र येऊन स्त्रियांना स्वतंत्र, सुदृढ व संपूर्ण जीवन जगण्यास शिकवले पाहिजे. केवळ होणाऱ्या अन्यायासाठी एकत्र न येता आपले आरोग्य उत्तम राहण्यासाठीसुद्धा स्त्रियांनी एकत्र यायला हवे.

## अ‍ॅक्ने, ब्लॅकहेडचा त्रास दूर करण्यासाठी कसा कराल मुलतानी मातीचा वापर

**त्वचेच्या समस्या कमी करण्यासाठी पूर्वीपासून मुलतानी मातीचा वापर केला जातो. या आयुर्वेदिक उपायामुळे अ‍ॅक्ने, कळवंडलेली त्वचा, सनटॅन कमी करण्यास मदत होते. मात्र आजकाल कॉस्मेटिक क्रीम्स आणि उपाचारांचा वापर अधिक केला जातो. मात्र त्याचा काही दुष्परिणाम त्वचेवर होऊ शकतो. म्हणूनच हा धोका टाळण्यासाठी मुलतानी माती हा सुरक्षित आणि नैसर्गिक उपाय वापरणे अधिक फायदेशीर आहे.**



**कशी ठरते मुलतानी माती फायदेशीर?**

▮ मुलतानी मातीमध्ये मॅग्नेशियम क्लोराईडचे प्रमाण आढळते. यामुळे अ‍ॅक्नेचा त्रास कमी होण्यास मदत होते.

▮ तेलकट त्वचेवर मुलतानी मातीचा वापर केल्यास अतिरिक्त तेल आणि त्वचेचा तेलकटपणा कमी होतो. तसेच पुन्हा पिंपल येण्याचे प्रमाण कमी होते.

▮ चेहऱ्यावर मुलतानी मातीचा फेसपॅक लावल्याने त्वचेवरील मळ कमी होतो. तसेच तेल आणि मृतपेशींचा थर कमी होतो.

▮ मुलतानी मातीमुळे त्वचेवर थंडावा निर्माण होतो. त्यामुळे डाग, लालसरपणा कमी होतो.

▮ उन्हात फिरल्याने होणारे सनटॅन, पिंगमेंटेशनचा त्रास कमी होण्यास मदत होते.

▮ व्हाईटहेड्स, ब्लॅकहेड्सचा त्रास कमी होण्यासाठी मुलतानी माती फायदेशीर ठरते.

▮ चांगल्या आयुर्वेदिक भंडार / दुकानामधून घेतलेल्या मुलतानी मातीचा त्वचेवर मुळीच दुष्परिणाम होत नाही.

### त्वचेच्या प्रकार ओळखून त्यानुसार कसे कराल मुलतानी मातीचे फेसपॅक

**तेलकट त्वचेसाठी**

तुमची त्वचा तेलकट असल्यास योग्य फेसवॉशची निवड करून चेहरा नियमित धुवा. तसेच मुलतानी मातीचा फेसपॅक बनवताना त्यामध्ये गुलाबपाणी आणि चिमूटभर हळद मिसळा. हा पॅक चेहऱ्यावर आणि मानेवर पातळ थराच्या उंचीचा लावा. हा नैसर्गिकरीत्या सुकू द्या. त्यानंतर पाण्याने स्वच्छ धुवा. हा पॅक लावल्यानंतर चेहऱ्याची फार हालचाल करू नका. बोलू नका.

**सामान्य त्वचेसाठी**

■ सामान्य त्वचेवर मुलतानी मातीचा वापर करताना मुलतानी मातीची पेस्ट गुलाबपाण्याऐवजी दुधात बनवावी.

■ अ‍ॅक्नेचा त्रास कमी करण्यासाठी मुलतानी मातीचा वापर करत असल्यास मुलतानी मातीसोबत कडुलिंब, कापूर आणि गुलाबपाण्याचा वापर करा. हा पॅक चेहऱ्यावर आठवड्यातून एकदा लावावा.

■ पिंपल्सचे डाग, खुणा कमी करण्यासाठी मुलतानी माती वापरत असल्यास त्यामध्ये टोमॅटोचा रस मिसळा. सोबतच चंदन, हळदीचा या फेसपॅकमध्ये समावेश करू शकता.

■ चेहऱ्यावर काळे डाग असल्यास मुलतानी मातीमध्ये दही, पुदिन्याची पानं याची पेस्ट मिसळून तयार पॅक चेहऱ्यावर डाग असलेल्या जागी लावावा. अर्धा तासानंतर हा पॅक कोमट पाण्याने स्वच्छ धुवावा.

■ चेहऱ्यावरील त्वचेच्या समस्या कमी करण्यासाठी तुम्ही मुलतानी मातीसोबत काही इसेन्शिअल ऑईल मिसळू शकता.



## सकाळी रिकाम्या पोटी स्प्राउटेड चणे खा आणि रोग टाळा

**सकाळी :** सकाळी रिकाम्या पोटी स्प्राउटेड चणे खाणे खूप फायदेशीर आहे, यामुळे शरीर स्वस्थ राहते आणि रोग जवळपास देखील येत नाही. स्प्राउटेड चणे संपूर्ण किंवा वाटून साखर आणि पाण्यासोबत खाल्ल्याने शरीरातील प्रोटीनचे प्रमाण कायम राहते. तसेच स्नायू देखील मजबूत होतात. कोणत्याही स्वरूपात स्प्राउटेड चणे वापरणे फायदेशीर आहे. हे सलाड म्हणून देखील वापरले जातात. यामध्ये प्रोटीन, विटामिन आणि फायबरचे असलेले प्रमाण तणाव दूर करण्यास मदत करते.



### स्प्राउटेड चणे वापरण्याचे ८ फायदे

▮ चण्यामध्ये फायबरची मात्रा जास्त राहते. भिजवून खाल्ल्याने पोट किंवा कब्जा संबंधी समस्या टाळता येते.

▮ मूत्र समस्या असल्यास किंवा पुन्हा पुन्हा मूत्र येत असेल तर चणा अत्यंत फायदेशीर आहे.

▮ रिकाम्या पोटी चणे खाण्याने शरीरात अतिरिक्त प्रमाणात ग्लुकोज बनत नाही. मधुमेह देखील नियंत्रणात राहतो.

▮ मानसिक तणाव असलेल्या लोकांसाठी चणा खूप फायदेशीर आहे.

▮ सकाळी वाटलेल्या चण्यासोबत साखर किंवा पाणी मिसळून प्यायल्याने मानसिक तणाव दूर होतो.

▮ कावीळ असलेल्या रुग्णांनी नियमितपणे चणे खावे. हे बरेच फायदेशीर असतात.

▮ स्प्राउटेड चणे हिरव्या मुगासोबत खाल्ल्याने खाण्याने प्रोटिनची मात्रा वाढते.

▮ याच्या नियमित सेवनाने थकवा दूर होण्यास मदत मिळते.

## नाचता नाचता व्यायाम!

**झुंबा या प्रकारात एकामागोमाग एक गाणी लावून त्यावर ठरावीक पद्धतीने बसवलेल्या नृत्यासारख्या स्टेप्स केल्या जातात. एरोबिक्स, बॉलीवूड डान्स आणि झुंबा.. सध्या हे व्यायाम प्रकार प्रचंड लोकप्रिय आहेत. ३१ डिसेंबरला आणि नववर्षात छान 'फिट' दिसायचे 'लक्ष्य' ठेवून तरुणांबरोबर मध्यमवयीन वर्गही 'जिम'कडे वळतो आहे. मुळात नाचता नाचता व्यायाम होऊन जाणार ही संकल्पनाच आकर्षक आणि मजेशीर वाटावी अशी आहे. या व्यायाम प्रकारांनी शरीराला नेमका कसा व्यायाम होतो ते जाणून घेऊया एरोबिक्स ट्रेनर डॉ. पलक कुलकर्णी यांच्याकडून..**



**एरोबिक्स**

सत्तरच्या दशकातच परदेशात एरोबिक्स लोकप्रिय होऊ लागले होते. त्यानंतर लोकांनी त्यांच्या व्यायामाच्या गरजेनुसार इतर प्रकार शोधून काढायला सुरुवात केली. 'झुंबा'ची सांगितली जाणारी जन्मकथाही मजेशीर आहे. ज्या व्यक्तीने हा झुंबा शोधला तेही एरोबिक्स ट्रेनर होते. एका दिवशी त्यांची एरोबिक्सची सीडी विसरली आणि लॅटिन प्रकारच्या डान्स सीडीवरून व्यायाम प्रकार घेतले गेले आणि त्यातून झुंबा आला असं म्हटलं जातं. पण झुंबा असो की बॉलीवूड डान्स. सगळ्याचा पाया एरोबिक्स हाच! एरोबिक्स म्हटलं म्हणजे तालबद्ध कवायत डोळ्यासमोर येते. पण उगीचंच कशाही उड्या मारणे किंवा इकडे-तिकडे वळून व्यायाम करणे म्हणजे एरोबिक्स नव्हे. हा प्रकार खूप व्यवस्थित आणि विचारपूर्वक ठरवलेल्या 'स्टेप्स'वर करायचा असतो. रोज तेच तेच करायचा कंटाळा येऊ नये म्हणून सतत वेगवेगळ्या 'कॉम्बिनेशन्स'मध्ये हालचाली केल्या जातात. त्यामुळे आज एरोबिक्समध्ये नवीन काय करणार याची उत्सुकता टिकून राहते. एरोबिक्समध्ये 'फ्लोअर एरोबिक्स' व 'बेंच एरोबिक्स' असे दोन प्रकार आहेत.

फ्लोअर एरोबिक्समध्ये सुरुवातीला 'वॉर्मअप' व्यायाम करावे लागतात. यातही नुसते कसेही हात-पाय हलवून चालत नाही. वॉर्मअपच्याही ठरलेल्या स्टेप्स असतात. त्यालाच जोडून ३० ते ४० मिनिटे पोटावरील स्नायूंना (अ‍ॅब्ज) तसेच कमरेखालच्या व वरच्या शरीराला व्यायाम दिला जातो. एरोबिक्समध्येसुद्धा बॉलीवूड डान्सच्या काही स्टेप्स करता येतात. ते करताना लोकांना मजा येते. व्यायामाची क्षमता म्हणजे 'स्टॅमिना' कमी असणाऱ्यांना या प्रकाराने सुरुवात करता येईल. जे लोक खूप वर्षांपासून एरोबिक्स करत आहेत त्यांना मात्र बेंच एरोबिक्स हा प्रकार अधिक आवडतो असं दिसून येतं. यातही वॉर्मअप असतोच. पण प्रत्यक्ष व्यायाम 'बेंच'वर म्हणजे ठरावीक उंचीच्या मोड्यांवर साधारण ३० मिनिटांसाठी असतो. कमरेखालचे आणि वरचे शरीर व हृदय यांच्यासाठी हा चांगला व्यायाम आहे. यात बेंचच्या स्टेप्स चढणे व उतरण्यात पायांचाही खूप वापर होतो.

### झुंबा आणि बॉलीवूड डान्स

झुंबा या प्रकारात एकामागोमाग एक गाणी लावून त्यावर ठरावीक पद्धतीने बसवलेल्या नृत्यासारख्या स्टेप्स केल्या जातात. यातली संगीत व गाणी ठरलेली असतात. संगीत हेच झुंबाच्या आकर्षणाचे केंद्र आहे. संगीताच्या तालावर पाय आपसूक थिरकायला लागतात आणि नाचायचा हुरूप येतो. ७-८ वर्षांपूर्वीपासून झुंबा आपल्याकडे आला आणि हळूहळू लोकप्रियही होऊ लागला. बॉलीवूड डान्समध्येही वॉर्मअप चुकत नाही. पुढची ३० ते ४० मिनिटे व्यायाम करायचा असल्याने तो गरजेचा असतो. यात रोज हिंदी चित्रपटातील वेगळे गाणे घेऊन त्यावर शरीराला व्यायाम होईल, अशा प्रकारे नाचाच्या स्टेप्स बसवल्या जातात. यातला कोणताही नाच शिकणे व करणे अवघड नसते हे महत्त्वाचे.

गटाने करायच्या व्यायामात अनेकांना नवे मित्र भेटतात हे देखील व्यायाम लोकप्रिय होण्यामागचे कारण असू शकेल. एकट्यानेच चालायला किंवा पळायला जाणे किंवा एकट्यानेच जिममध्ये जाऊन व्यायाम करणे अनेकांना कंटाळवाणे वाटते आणि थोड्या दिवसांनी 'जिम'चा उत्साहसुद्धा कमी कमी होत जातो. याउलट संगीताच्या तालावर नाचण्याचा कंटाळा येत नाही, शिवाय बरोबरीच्या गटातले सगळेच नाचत असतात. त्यामुळे नव्याने आलेल्या व्यक्तीचा उत्साह टिकतो.

# पुण्यातील हायप्रोफाईल शाळेत राडा

## पालक म्हणाले ६० हजार फी देऊन... शिक्षकांची वेगळीच अडचण

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

पुण्यातील सिंहगड संस्थेच्या हायप्रोफाइल शाळेत गेल्या १६ महिन्यांपासून शिक्षक आणि इतर कर्मचाऱ्यांना पगार मिळालेला नाही. यामुळे त्यांच्यात असंतोष निर्माण झालाय. 'ही व्यवस्थापनाची मोठी चूक आहे. जर शिक्षकच खुश नसतील तर ते विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण कसे देऊ शकतील?' असा प्रश्न विचारला जातोय. पालक दरवर्षी ६० हजार रुपये फी भरतात, तरीही शाळा योग्य प्रकारे चालत नाही. यामुळे मुलांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. पालकांनी याबाबत शाळेच्या मुख्याध्यापकाशी बोलून सखोल चौकशी केली पाहिजे, अशी मागणीही शिक्षक करतायत.

**विद्यार्थ्यांना अडचणी**

शाळेत शिक्षक दर सहा महिन्यांनी बदलतात. ज्यामुळे मुलांना नवीन शिक्षकांसोबत जुळवून घेण्यात त्रास होतो. हे बदल होण्याचे मुख्य कारण म्हणजे पगार न मिळाल्याने जुने शिक्षक नोकरी सोडतात आणि नवीन येतात. अशा परिस्थितीत मुलांच्या अभ्यासावर विपरीत परिणाम होतो. त्यांना सातत्यपूर्ण मार्गदर्शन मिळत नाही, ज्यामुळे त्यांचा आत्मविश्वास कमी होऊ शकतो. पालक आणि विद्यार्थी यात काही दोषी नाहीत, ही पूर्णपणे शाळा व्यवस्थापनाची जबाबदारी आहे. यामुळे मुलांचे भविष्य धोक्यात आलय.

**पालकांना टाळाटाळीचं उत्तर**

याआधी अनेकदा पालकांनी शाळेतील पर्यवेक्षकांकडे या समस्येबाबत विचारणा केली, पण प्रत्येक वेळी त्यांना अस्पष्ट आणि टाळाटाळ करणारी उत्तरे मिळाली. शाळा प्रशासन समस्या सोडवण्यात गंभीर नाही. पालकांनी मोठी फी भरूनही त्यांच्या मुलांना चांगली सेवा मिळत नसल्याचा आरोप करण्यात आलाय. यामुळे त्यांच्यात राग आणि असंतोष वाढतोय.

**पालकांचा संताप आणि फीचा प्रश्न**

दरवर्षी ६० हजार रुपये फी भरूनही शाळा का बंद राहते?, असा प्रश्न पालक उपस्थित करत आहेत. ही फी भरूनही मुलांना योग्य शिक्षण आणि सुविधा मिळत नाहीत, ज्यामुळे पालकांमध्ये मोठा असंतोष आहे. संस्था पैसे घेते पण जबाबदारी पार पाडत नाही. यासाठी पालकांनी याबाबत एकजूट दाखवली पाहिजे आणि शाळेच्या व्यवस्थापनावर दबाव आणला पाहिजे, असे मत पालक संघटनांनी व्यक्त केलंय.



**कर्मचाऱ्यांचे आंदोलन**

पुन्हा एकदा सिंहगड शाळेतील कर्मचाऱ्यांना पगार थकल्याने बस चालक आणि सफाई कर्मचारी यांनी निदर्शन सुरू केले आहे. यामुळे गेल्या सोमवारपासून शाळा बंद आहे. हे आंदोलन थांबवण्यासाठी व्यवस्थापनाकडून काही हालचाली करणे अपेक्षित आहे. पण तसे होताना दिसत नाही. ज्यामुळे पालक आणि विद्यार्थ्यांवर त्याचा थेट परिणाम होतोय. मुलांचे वर्ग सुरू होत नाहीत आणि अभ्यासात खंड पडतोय.

# कल्याण स्थानकावर तोतया रेल्वे विजिलन्स निरीक्षकाला अटक

■कल्याण। प्रतिनिधी,

कल्याण रेल्वे स्थानकावर गुरुवारी सेंट्रल रेल्वेच्या विजिलन्स पथकाने मोठी कारवाई करीत बनावट रेल्वे बोर्ड विजिलन्स निरीक्षकाला लाच घेताना अटक केली. अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव हरीश कांबळे असे आहे. कल्याण लोहमार्ग पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार, एका रेल्वे कर्मचाऱ्याने विजिलन्स विभागाकडे तोंडी तक्रार केली होती. एक व्यक्ती स्वतःला रेल्वे बोडार्चा विजिलन्स निरीक्षक असल्याचे सांगून धमकावत पैसे मागत असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले होते. या तक्रारीच्या आधारे सेंट्रल रेल्वे विजिलन्स पथकाने कल्याण स्थानकावर सापळा रचला. गुरुवारी दुपारी सुमारे १४:३० वाजण्याच्या सुमारास, कल्याण रेल्वे स्थानकावरील फूट ओव्हर ब्रिज येथे हरीश कांबळे याला २० हजार रुपये स्वीकारताना विजिलन्स पथकाने पकडले. मुंबई येथील डीआरएम कार्यालयातून थकीत देयक मंजूर करून देण्यासाठी ही रक्कम घेत असल्याचा दावा आरोपीने केला होता. तपासात असेही उघडकीस आले आहे की काही महिन्यांपूर्वी



याच रेल्वे कर्मचार्‍याकडून आरोपीने ६० हजार रुपयांची मागणी केली होती. ही रक्कम फोन-पेच्या माध्यमातून त्याच्या खात्यात जमा करण्यात आली होती. विजिलन्स पथकाने प्राथमिक चौकशीनंतर आरोपीला पुढील कायदेशीर कारवाईसाठी जीआरपी कल्याणच्या ताब्यात दिले आहे. विशेष म्हणजे, हरीश कांबळे याच्यावर २०१२ साली सीएसएमटी रेल्वे पोलीस ठाण्यात बनावट टीसी (तिकीट तपासनीस) म्हणून वावरल्याप्रकरणी गुन्हा दाखल असल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेमुळे रेल्वे प्रशासनात एकच खळबळ उडाली आहे. आरोपीचे जुने गुन्हेगारी रेकॉर्ड, बँक खाती आणि संपर्कांची सखोल चौकशी विजिलन्स विभागाकडून करण्यात येत असून, या प्रकारामागे एखादे मोठे फसवणूक रॅकेट कार्यरत आहे का, याचा शोध घेतला जात आहे.

# सायबर गुन्हेगारांचा नवा डाव

## मोबाईलमधील ॲपमुळे १० लाखांची लूट, बँक नोटिफिकेशनही बंद

■मुंबई । प्रतिनिधी,

डिजिटल व्यवहार वाढत असताना सायबर फसवणुकीचे प्रकारही अधिक धोकादायक होत चालले आहेत. गोरेगावमध्ये घडलेल्या एका प्रकरणाने मोबाईल आणि ऑनलाईन बँकिंग सुरक्षेबाबत गंभीर प्रश्न निर्माण केले आहेत. एका नामांकित उद्योगपतीचा मोबाईल हॅक करून सायबर भामट्यांनी थेट त्यांच्या बँक खात्यातून ९ लाख ७१ हजार ३८० रुपये लंपास केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. विशेष म्हणजे, इतकी मोठी रक्कम खात्यातून काढली गेली तरी पीडिताच्या मोबाईलवर कोणताही ओटीपी, एसएमएस किंवा ई-मेल अलर्ट आला नव्हता.

**नेमकं काय घडलं?**

गोरेगाव पश्चिमेकडील वसंत गॅलेक्सी सोसायटीत राहणारे ५३ वर्षीय दीपक विश्वंभरलाल बघेरिया हे केमिकल मॅन्युफॅक्चरिंग व्यवसायात कार्यरत आहेत. त्यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यात ही फसवणूक झाली होती. मात्र, जानेवारी महिन्यात बँक स्टेटमेंट तपासल्यानंतर हा प्रकार त्यांच्या लक्षात आला. २ जानेवारी रोजी खात्याचा तपशील पाहताच २१





डिसेंबर रोजी तीन वेगवेगळ्या व्यवहारांतून जवळपास दहा लाख रुपये खात्यातून काढले गेल्याचे दिसून आले.

विशेष म्हणजे, व्यवहाराच्या वेळी बँकेकडून येणारे नेहमीचे अलर्ट पूर्णपणे बंद झाले होते. त्यामुळे संशय अधिक गडद झाला. याबाबत दीपक यांनी बँक शाखेत चौकशी केली असता, रक्कम युनियन बँक ऑफ इंडिया आणि इंडियन ओव्हरसीज बँकेतील वेगवेगळ्या खात्यांमध्ये पाठवली असल्याची माहिती समोर आली.

यानंतर त्यांनी सायबर एक्सपर्ट असलेल्या आपल्या भावाची मदत घेतली. मोबाईलमध्ये भारत सरकारचे अधिकृत 'm-Kavach 2' सिक्युरिटी ॲप डाउनलोड करून फोन स्कॅन करण्यात आला. स्कॅनिंगदरम्यान मोबाईलमध्ये 'RTO Challan.apk' नावाची संशयास्पद फाइल सक्रिय असल्याचे आढळून आले. ही फाइल वापरकर्त्याच्या नकळत इन्स्टॉल झाली होती. तपासात असे समोर आले की, या फाइलमुळे मोबाईलचा संपूर्ण रिमोट ॲक्सेस सायबर भामट्यांच्या हाती गेला होता. याच माध्यमातून बँकिंग ॲपची माहिती चोरण्यात आली आणि बँककडून येणारे सर्व अलर्ट मेसेज ब्लॉक करण्यात आले.

पोलिसांच्या प्राथमिक तपासानुसार, ही घातक लिंक १६ डिसेंबर रोजी दीपक यांच्या एका जुन्या क्लायंटच्या व्हॉट्सॲप अकाउंटवरून पाठवण्यात आली होती. संबंधित क्लायंटचा व्हॉट्सॲप अकाउंट आधीच हॅक करण्यात आला असावा, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. लिंकवर क्लिक केल्यानंतरच संपूर्ण फसवणुकीचा मार्ग मोकळा झाला.

कामानिमित्त गुजरातमधील वापी येथे असल्याने दीपक यांना तात्काळ तक्रार देता आली नव्हती. मुंबईत परतल्यानंतर त्यांनी सर्व डिजिटल पुराव्यांसह पोलिसांत तक्रार दाखल केली आहे. पोलिसांनी गुन्हा नोंदवून संबंधित बँक खाती, मोबाईल ॲप्स आणि सायबर ट्रेलच्या आधारे तपास सुरु केले. पुराव्यांसह त्यांनी पोलिसात तक्रार दाखल केली.

# प्रतिक्षा संपली!!! बेलासिस फ्लायओव्हरचं काम पूर्ण, लवकरच प्रवाशांसाठी खुला होणार...

■मुंबई। प्रतिनिधी,

मुंबईकरांसाठी एक दिलासाजनक बातमी समोर आली आहे. जानेवारी २०२६ च्या पहिल्या आठवड्यात बेलासिस फ्लायओव्हर जनतेसाठी खुला होणार असल्याचं सांगितलं जात आहे. ताडदेव, नागपाडा आणि मुंबई सेंट्रल रेल्वे स्टेशनकडे जाणाऱ्या प्रवाशांसाठी हा प्रवास अधिक सुविधानजक होणार आहे. बीएमसीच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, यापूर्वी एप्रिल २०२६ ही फ्लायओव्हरची डेडलाइन निश्चित करण्यात आली होती. मात्र, कंत्राटदारांनी मिळून हा प्रोजेक्ट लवकर पूर्ण करण्याचा निर्णय घेतला. आता, मुंबईतील



रहिवासी बेलासिस उड्डाणपुलावरून प्रवास करू शकणार आहेत.

रेल्वे अधिकाऱ्यांकडून एनओसी जारी झाल्यानंतर, बीएमसी बेलासिस फ्लायओव्हर लवकरच खुलं करण्याची तयारी आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, जसं कार्नाक ब्रिजचं नाव बदलून 'सिंदूर' ठेवण्यात आलं, तसंच बेलासिस फ्लायओव्हरचं नाव बदललं जाणार असल्याची माहिती आहे. खरं तर, बेलासिस फ्लायओव्हर ब्रिटीश राजवटीत बांधण्यात आला होता आणि म्हणूनच त्याला हे नाव देण्यात आले आहे. मात्र, या नावाचा भारतीय संस्कृतीशी किंवा महाराष्ट्राच्या ऐतिहासिक शौयार्शी काहीही संबंध नाही. म्हणून, या उड्डाणपुलाचं नाव बदलण्याचा विचार केला जात आहे. जून २०२४ मध्ये जुना पूल पाडून नव्या पुलाच्या बांधकामाचं काम वेगानं सुरू झालं. या प्रोजेक्टसाठी बीएमसीकडून ७० कोटी तर रेल्वे विभागाकडून ४० कोटी रुपये देण्यात आले. केबल-स्टेड डिझाइनसह हा ३५० मी. लांबीचा आधुनिक फ्लायओव्हर तयार केला जात आहे.

**आयुक्त अभिजीत बांगर यांनी दिली माहिती**

सप्टेंबर २०२४ मध्ये या पुलाच्या बांधकामाचे आदेश देण्यात आले आणि सतत प्रयत्न तसेच काटेकोर नियोजनामुळे हा प्रकल्प नियोजित वेळेच्या खूप आधी पूर्ण झाला. बीएमसीचे अतिरिक्त आयुक्त अभिजीत बांगर याबाबत म्हणाले की, गेल्या काही महिन्यांपासून ते प्रकल्पाच्या प्रगतीवर वैयक्तिकरित्या लक्ष ठेवून आहेत. त्यांनी सांगितलं की, बीएमसी, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) आणि महाराष्ट्र रेल्वे पायाभूत सुविधा विकास महामंडळ (एमआरआयडीसी) या तीन संस्थांमधील समन्वय हेच प्रोजेक्ट लवकर पूर्ण होण्याचं प्रमुख कारण आहे. तसेच, कामाच्या दरम्यान कंत्राटदाराला आलेल्या कोणत्याही समस्या त्वरित सोडवण्यात आल्या.

## माझ्या पतीला टॉर्चर केलं गेल... ते आत्महत्या करूच शकत नाहीत

# बीडच्या 'त्या' जीएसटी अधिकाऱ्याच्या पत्नीचा खळबळजनक दावा

■बीड। प्रतिनिधी,

काही दिवसांपूर्वी बीड येथील सचिन जाधवर या जीएसटी अधिकाऱ्याने आत्महत्या केल्याचे प्रकरण राज्यभर गाजले होते. त्यांच्या खिशात सापडलेल्या सुसाईड नोटमध्ये वरिष्ठ अधिकारी त्यांना त्रास देत असल्याचं नमूद केलं होतं. मात्र त्यांच्या पत्नीने वेगळाच दावा केला आहे. मयुरी जाधवर असं त्या अधिकाऱ्याच्या पत्नीचं नाव आहे. 'वरिष्ठ अधिकारी माज्या पतीचा छळ करत होते. ते आत्महत्या करुच शकत नाहीत. यामध्ये दोषी असलेल्या अधिकाऱ्याला शिक्षा व्हावी' अशी मागणी मयुरी जाधवर यांनी केली आहे.



**मयुरी जाधवर यांनी काय आरोप केले?**

मयुरी जाधवर यांनी पतीच्या आत्महत्येबद्दल शंका व्यक्त केली आहे. त्या म्हणाल्या की, 'आठ दिवसांपासून माज्या पतीला मानसिक त्रास दिला जात होता. त्यांच्या गाडीमध्ये सुसाईड नोट असल्याचे सांगितले जाते, मात्र ती आम्हाला दाखवण्यात आलेली नाही.' यानंतर मयुरी यांनी मागणी केली की, 'ती सुसाईड नोट आम्हाला दाखवावी आणि समोर आलेल्या दोषी अधिकाऱ्याला थेट शिक्षा व्हावी.' तसेच माझे पती आत्महत्या करूच शकत नाहीत असा ठाम दावा करत त्यांनी पोलीस अधीक्षकांची भेट घेऊन न्यायाची मागणी केली. माझी फिर्याद नोंदवून आरोपीला तात्काळ अटक करावी, अशीही मागणी त्यांनी पोलीस अधीक्षक कार्यालय परिसरात बोलताना केली.

**काय घडला होता प्रकार?**

सहा दिवसापूर्वी बीड येथे राज्य कर अधिकारी म्हणून कार्यरत असलेल्या अधिकाऱ्याचा संशयास्पद मृत्यू झाल्याचे समोर आले आहे. सचिन जाधवर असे या अधिकाऱ्याचे नाव असून ते दोन दिवसापासून बेपत्ता होते. या संदर्भात त्यांच्या पत्नीने बीड मधील शिवाजीनगर पोलीस ठाण्यात तक्रार देखील दिली होती. सचिन जाधवर यांची कार सोलापूर-धुळे महामार्गालगत आढळून आली. त्या ठिकाणी पोलिसांनी पाहणी केली असता सचिन जाधवर हे कारमध्ये मृत अवस्थेत आढळून आले. कारमध्ये कोयता आणि मडकं सापडलं आहे, त्यामुळे संशय बळावला आहे.

**तक्रारीची दखल घेतली असती तर...**

सचिन जाधवर यांनी त्यांना देण्यात येत असलेल्या त्रासाबद्दल वरिष्ठ कार्यालयाकडे तक्रार दिली होती. मात्र त्याची दखल घेण्यात आली नाही. दखल घेतली असती तर त्यांनी आत्महत्या केली नसती अशी चर्चा होत आहे. दरम्यान, बीडमध्ये कार्यरत असलेल्या त्या अधिकाऱ्याची बदली जालन्याला झाली असूनही तो बीडमध्ये अजूनही कसा कार्यरत होता, असा सवाल सचिन यांच्या कुटुंबियांनी उपस्थित केला आहे.

## नागपूरमधील ओयो हॉटेलमध्ये प्रेमाचा भयानक अंत

# दोघांमध्ये वाद प्रियकराने तरुणीवर चाकूने सपासप वार करत संपवलं

■मुंबई । प्रतिनिधी,

नागपूरमधील ओयो हॉटेलमध्ये एका तरुणीचा मृतदेह आढळून आल्याचं वृत्त आहे. तिच्या प्रियकराने चाकूने वार करत तिचा खून केला आणि नंतर तो घटनास्थळावळून पळून गेला. ही घटना २३ जानेवारी दुपारी नागपूर जिल्ह्यातील कळमेश्वर रोडवरील फेत्री गावाजवळील ओयो हॉटेलमध्ये घडली. मृत महिलेचं नाव रुचिता भांगे असल्याचं सांगितलं जात आहे. प्रियकराने असं कृत्य का केलं असावं याबाबतची माहिती समोर आली आहे.

**प्रियकरावर गुन्हा दाखल**

या हल्ल्यात तरुणी ही गंभीर जखमी झाली होती. काही वेळानंतर तिचा जागीच मृत्यू झाला होता. या घटनेची माहिती मिळताच वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली आणि नंतर तपास सुरु केला. सध्या नागपूर ग्रामीण कमलेश्वर पोलिसांनी आरोपी प्रियकरावर गुन्हा दाखल केला आहे, पण आरोपी सध्या फरार झाला असून त्याचा शोध घेणं सुरु आहे.





**प्रियकराने ओयो हॉटेलमध्ये प्रेयसीचा खून करत पळ काढला**

प्रेमप्रकरणातून झालेल्या या हत्येमुळे परिसरात एकच खळबळ माजली आहे. प्रेयसीची हत्या केल्यानंतर प्रियकराने हॉटेलच्या पहिल्या मजल्यावरून उडी मारत घटनास्थळावरून पळ काढला. कमलेश्वर पोलीस ठाण्यातील अधिकाऱ्याकडून मिळालेल्या माहितीनुसार, ओयो हॉटेलमध्ये दोघांमध्ये वाद झाला आणि याच वादातून प्रियकराने तिच्या मानेवर चाकूने वार करत संपवलं.

# १४ वर्षीय मुलावर ट्यूशन टीचरकडून लैंगिक अत्याचार

## मित्राने बदला घेण्याचं ठरवलं अन्... शिक्षकासोबत घडलं भयंकर!

■मुंबई । प्रतिनिधी,

एका १४ वर्षाच्या अल्पवयीन मित्राला त्याच्या ट्यूशन टीचरच्या वाईट कृत्यापासून वाचवण्यासाठी पीडित तरुणाच्या १८ वर्षीय मित्राने कायदा हातात घेतल्याची बातमी समोर आली आहे. पोलिसांनी या प्रकरणातील आरोपी किशोरला अटक केली असून त्याने त्याच्यावरील लैंगिक अत्याचाराचा बदला घेण्यासाठी हे भयंकर कृत्य केल्याचं सांगितलं जात आहे. संबंधित घटना ही २ जानेवारी रोजी घडली असून कोंडली पुलाजवळ एका तरुणावर चाकूने वार करण्यात आल्याची माहिती पोलिसांना मिळाली. ३२ वर्षीय जय प्रकाश अशी जखमी तरुणाची ओळख समोर आली असून त्याच्या पोटावर आणि पाठीवर गंभीर जखमा होत्या आणि त्यानंतर त्याला तातडीने एम्स ट्रॉमा सेंटर येथे रेफर करण्यात आलं.

घटनास्थळावर तपास केला असता पीडित तरुणाचा मोबाईल फोन आणि पैसे गायब होते. प्रकाशने पोलिसांना सहकार्य करण्यास थांबवल्यानंतर हे प्रकरण अधिक गुंतागुंतीचं झालं. त्यानंतर, दिल्ली पोलिसांनी टेक्निकल सर्व्हिलांसच्या मदतीने तपास सुरू केला आणि जवळपास 150 सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले. एका फुटेजमध्ये कोंडली पुलाजवळ पीडित प्रकाश आपल्या सायकलवरून तरुणाला घेऊन जाताना दिसला.

२३ मिनिटांनंतर, जय प्रकाश एकटा रक्ताने माखलेल्या अवस्थेत परत येताना दिसला. त्यानंतर, पोलिसांनी सायकलवर मागे बसलेल्या अल्पवयीन तरुणाची ओळख पटवली आणि ताब्यात घेतलं. त्यावेळी, त्याने सुरुवातीला चोरीची खोटी कहाणी सांगितली. मात्र, कठोर चौकशी केल्यावर सत्य उघडकीस आलं. त्या अल्पवयीन तरुणाने सांगितलं की, त्याचा शिक्षक गेल्या सहा महिन्यांपासून त्याचं लैंगिक शोषण करत होता आणि त्याने त्याचा १८ वर्षीय मित्र देवराजला ही बाब सांगितली.

त्यानंतर, दोघांनी मिळून जय प्रकाशाला धडा शिकवण्याचा योजना आखली. ठरल्याप्रमाणे, नाला रोडच्या एका अंधाऱ्या आणि निर्जन ठिकाणी प्रकाशवर चाकूने हल्ला करण्यात आला. या हल्ल्याला चोरीची घटना दाखवण्यासाठी देवराजने त्याचा मोबाईल आणि त्याच्याकडील जवळपास ३०० रुपये हिसकावून घेतले. पोलिसांनी आता देवराजला अटक केली असून त्याच्याजवळील फोन आणि चाकू सुद्धा जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी पोलिसांनी ट्यूशन टीचर जय प्रकाशविरुद्ध पॉक्सो ॲक्ट आणि भारतीय दंड संहितेच्या संबंधित कलमांखाली गुन्हा दाखल केला. तसेच, आरोपी देवराजविरुद्ध हत्येचा प्रयत्न केल्याप्रकरणी आणि चोरीच्या आरोपाखाली गुन्हा दाखल करून कारवाई केली जात आहे. आता पोलीस या प्रकरणाचा सर्व बाजूंनी तपास करत असून दोघांची चौकशी केली जात आहे.

# सिग्नलवर गुलाबाची फुलं विकणाऱ्या ११ वर्षीय मुलीवर लैंगिक अत्याचार... रिक्षाचालकाचे सैतानी कृत्य

■मुंबई । प्रतिनिधी,

माणुसकीला काळिमा फासणारी आणि लाज आणणारी एक धक्कादायक घटना समोर आली आहे. ट्राफिक सिग्नलवर गुलाबाची फुलं विकणाऱ्या ११ वर्षीय मुलीला जंगलात नेऊन एका ई-रिक्षा ड्रायव्हरने लैंगिक अत्याचार केला आहे. यानंतर पोलिसांनी ३०० सीसीटीव्ही कॅमेरे तपासून रिक्षा चालकाला ताब्यात घेतले आहे. दिल्लीतील ही घटना आहे. मात्र या घटनेमुळे देशाच्या राजधानीतील मुली आणि महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

ही लाज आणणारी घटना ११ जानेवारी रोजी घडली. पीडित मुलगी ही दिल्लीतील प्रसादनगर भागात गुलाबाची फुलं विकत होती. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ४० वर्षीय आरोपी दुर्गेशने रिक्षातील प्रवाशांना सोडल्यानंतर मुलीजवळ रिक्षा थांबवली आणि तिची गुलाबाची सर्व फुलं विकण्याचं आश्वासन देऊन तिला फसवले. मुलगी त्याच्या बोलण्याला बळी पडली आणि रिक्षात बसली.

**जंगलात नेऊन केले लैंगिक अत्याचार**

पीटीआयने दिलेल्या वृत्तानुसार, आरोपी पीडितेला दिल्लीतील प्रोफेसर रामनाथ वीज रोडजवळील एका जंगलात घेऊन गेला आणि तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. यानंतर पीडिता बेशुद्धावस्थेत रक्ताच्या थारोळ्यात तिथेच पडली. ती मृत झाल्याचे समजून आरोपी घटनास्थळावरुन फरार झाला. शुद्धीत आल्यानंतर पीडिता तशाच अवस्थेत घरी पोहोचली. यानंतर कुटुंबियांनी तिला हॉस्पिटलमध्ये भरती केले आणि पोलिसात तक्रारही दाखल केली.

**आधीच रचला होता कट**

चौकशी दरम्यान आरोपीने सांगितले की, हा कट त्याने आधीच रचला होता. गेल्या काही दिवसांपासून आरोपी त्या मुलीला सिग्नलवर बघत होता. आरोपीच्या माहितीवरुन पोलिसांनी रक्ताने माखलेले कपडे आणि इतर पुरावे जप्त केले आहेत. तसेच त्याच्याविरोधात अपहरण, बलात्कार आणि पोक्सो कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पीडितेवर सध्या रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

**३०० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या सहाय्याने उघडकीस आले प्रकरण**

तपासाच्या सुरुवातीला पीडिता मानसिक धक्क्यात असल्याने पोलिसांना तपास करणे अवघड झाले होते. ज्या ठिकाणापासून मुलगी त्या रिक्षात बसली तिथून जंगलापर्यंत जाणाऱ्या १५ रोड्सवरील तब्बल ३०० सीसीटीव्ही कॅमेरे पोलिसांनी तपासले. एका फुटेजमध्ये पीडिता रिक्षात बसताना दिसली. यानंतर त्या रिक्षाच्या रजिस्ट्रेशन क्रमांकाचा तपास घेत पोलिसांनी आरोपीला गाठले आणि त्याला अटक केली.



हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com